
म. ग्रं. सं. ठाणे.
१२७१
१४४७

# सामान्यांचा असामान्य नेता



REFBK-0016658

ले. सुधाकर रा. सामंत

१६६५८

[illegible]

[illegible]

[illegible]

१८८९

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ५०७५ वि: पारेख
क्रमांक १४७१ नों दि: ७।१।७८

सामान्यांचा
असामान्य नेता

# श्री. वसंतरावदादा पाटील

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
अ. क्र. १६६५८

लेखक
सुधाकर सामंत

REFBK-0016658

मेरुमणि प्रकाशन, मुंबई २८.

प्रकाशिका
सौ. सुचित्रा सामंत
मेरुमणि प्रकाशन
१८ ई भवानी शंकर रोड
दादर, मुंबई २८.

© प्रकाशकाधिन

चित्रकार : उमरोठकर

प्रथमावृत्ति : मे १९६८

**मूल्य : तीन रुपये**

मुद्रक :
**चिंतामण वामन जोशी**
माधव प्रिंटिंग प्रेस,
अलिबाग-कुलाबा.

ज्या शेतकऱ्याचे

जीवन समृद्ध

करण्यासाठी

दादांनी

कृषि औद्योगिक क्रान्तीचा

महायज्ञ सुरू केला

त्या

महाराष्ट्र भूमीच्या

प्रगतीशील शेतकऱ्याच्या

चरणी

सादर समर्पण

# प्रास्ताविक हवे कशाला ?

'नवे आव्हान आणि नवी झुंज' असा क्रम काही मोठ्या माणसांच्या जीवनात नियतीनेच लिहिला असावा असे मला नेहमी वाटते आणि त्याची उदाहरणे म्हणून मी श्री. यशवंतराव चव्हाण आणि वसंतराव पाटील यांची नावे सांगतो. या छोट्याशा चरित्रात वसंतराव दादांच्या जीवनातील राजकीय, सामाजिक व सहकार क्षेत्रातले आव्हान आणि झुंज प्रसंग अत्यंत साध्या, सोप्या, रसाळ भाषेत वर्णन केले आहेत. हे छोटेसे पुस्तक हाती घेतले की, पूर्ण वाचूनच खाली ठेवावे असे जिव्हाळ्याने लिहिले आहे. त्याला खरे म्हणजे प्रास्तविक काही नकोच.

माझ्या लहानपणी प्रा. ना. सि. फडके यांनी लिहिलेल्या दोन आयरिश देशभक्तांच्या छोट्या चरित्रांचा ठसा आजही माझ्या मनावर उमटलेला मला आठवतो. टेरेन्स मॅक्स्वीनी, इमॉन डी व्हॅलेरा या दोन क्रांतिकारक देशभक्त, प्रशासक, संघटनाकुशलांची ती नावे ! दादांचे जीवनचरित्र तशा तोडीचे आहे. क्षणभर लोक विसरतात, रुसतात, रागावतात पण दादा त्या सर्व वादळातून पार पडतात.

दादांनी पन्नाशी ओलांडली आहे. त्यांच्या जीवनाचा मध्यसूर्य माथ्यावर तळपत आहे. अजून त्यांची खरी शक्ती उपयोगात आणली गेलेली नाही. सांगली जिल्ह्यात त्यांनी जे फुलविले तेवढ्यावरच तो सहकाराचा प्रवास थांबता कामा नये. तसेच या प्रवासात कुठे काही अपूर्णता राहते की काय हे मागे वळून पाहण्याचाही हाच क्षण आहे.

पण तरुण पिढीला शाळेत जाणाऱ्या छोट्या यशवंत–वसंतांना उद्या आपला मार्ग कोणता आहे हे पाहण्यासाठी या छोट्या चरित्राचा 'प्रभाकर' कंदील उपयोगी पडेल. दहा वर्षांत दादांनी हजारो घरांचा विकास, प्रभाकर कंदिल वापरण्यापासून ट्रॅक्टर विद्युतपर्यंत आणून पोचविला आहे. दादांनी जे केले ते सांगितले नाही हाच एक दोष ठरतो की काय असा विपरीत काळ आला आहे. शिक्षण

वाढले पण ते सुशिक्षण आणि त्यातून 'सुशिक्षित' बाहेर पडले की कसे हे तपासण्याची वेळ आहे. अशा मंडळींना दादा जवळ असल्याने नीट दिसले नाहीत. त्यांनी हे चरित्र वाचले तर खरे दादा समजतील असे मला वाटते.

दादांच्या जीवनातला जेलफोडीचा समरप्रसंग आणि वैयक्तिक जीवनातला विवाहप्रसंग वाचताना आपले मन हेलावल्याविना राहत नाही. लेखक मला वाटते याच प्रसंगाचे वर्णन कुणाकडून ऐकत असताना चरित्र लिहिण्यास प्रवृत्त झाला आहे. त्याने आपले काम चोख बजावले आहे. कारण त्याची लेखणी भावनेतून बोलत होती लिहित होती.

– नरूभाऊ लिमये

# दोन शब्द

सुमारे दीड-दोन वर्षांपूर्वी 'कोंकण-वैभव'च्या एका कामानिमित्त भेट घेण्यासाठी श्री. वसंतरावदादा पाटील यांची मी 'अपॉईंटमेंट' घेण्याचे ठरविले. भेटायला केव्हा येऊ म्हणून विचारताच, फोनवरून उत्तर आले 'केव्हाही या.' मी थक्कच झालो. एवढ्या मोठ्या माणसाने इतक्या झटदिशी आपल्याला भेटायला बोलवावे! त्या दिवसापर्यंतचा इतरांच्या बाबतीतला माझा अनुभव थोडा वेगळा होता. मी दुसऱ्याच दिवशी भेटायला गेलो. पाच मिनिटांचे माझे काम पण दादांचा मी अर्धा तास घेतला. पण दादांनी एका शब्दानेसुद्धा– 'पुरे करा आता' असे सुचविले नाही. आणि मी संभाषण वाढवीतच होतो. कारण ते संपूच नये असे मला वाटत होते. दादांबरोबरच्या पहिल्याच भेटीत मी अक्षरशः भारावून गेलो. त्यानंतर आमचे मित्र श्री. दिनेश देसाई यांनी मुंबईत श्री. वसंतराव नाईक, श्री. वसंतराव पाटील आणि श्री. वसंतराव देसाई या तीन थोर वसंतांचा सत्कारसमारंभ घडवून आणला, त्या वेळी मी दादांच्या अधिक संपर्कात आलो. दादांचा परिचय वाढला. भेटीगाठीही वाढल्या. पण त्याचबरोबर दादांबद्दलचा माझा आदर कित्येक पटींनी वाढला. शेकडो लोक लहान–मोठ्या कामांसाठी दादांकडे आलेले मी पाहिले. पण एकही माणूस विन्मुख होऊन गेलेला पाहिला नाही. दादांचा हा अफाट लोकसंग्रह, साधी राहणी, गोड वाणी, विधायक कामांचा त्यांनी उभा केलेला डोंगर या सर्व गोष्टींचे मला जवळून दर्शन घडले.

काही संत पुरुषांच्या, राजकारणातील पुढाऱ्यांच्या थोडासा सान्निध्यात जाण्याचा सुयोग माझ्या वाट्याला सुदैवाने आला आहे. पू. विनोबाजी भावे, संत गाडगे महाराज यांची अल्पशी चरित्रेही मी लिहिली आहेत. दादा राजकारणातील एक नेते; पण मला त्यांच्यात देखील महान् संताचे दर्शन घडले. त्यांचे जीवन मी जितके जास्त जवळून पाहिले, अभ्यासिले तितका मी जास्तच प्रभावित झालो


दादांच्या या कर्मयोगी जीवनापासून माझ्यासारख्या आजच्या तरुणांनी अनेक गोष्टी घेण्यासारख्या आहेत, अशी माझी श्रद्धा बळकट झाली.

दादा एक थोर पुढारी आहेत. त्यांच्याबद्दल लिहिणारे अनेक थोर लेखकही आहेत. मी निश्चितच त्या मालिकेतला नाही. पण दादांच्या ठायी मला जे अनेक सद्‌गुण, सत्प्रवृत्ति दिसल्या त्या इतरांनाही दिसाव्यात, समजाव्यात, म्हणून दादांचे मला झालेले दर्शन सर्वांना घडविण्याचा हा एक नम्र प्रयत्न आहे. श्री. नरूभाऊ लिमये यांच्या-सारख्या अनुभवी पत्रकाराने प्रस्तावना लिहून प्रोत्साहन दिल्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

— सुधाकर रा. सामंत



पंतप्रधान इंदिरा गांधी समवेत दादा



महाराष्ट्राचे आणि भावी भारताचे देखील दोन आधारस्तंभ



केंद्रस्थानी गृहमंत्री पदाची धुरा वाहणारे यशवंतरावजी, शेतीत क्रांति घडविणारे मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक, सहकार महर्षी श्री. वसंतराव दादा पाटील आणि कर्तबगार कृषि मंत्री श्री. पी. के. सावंत अशा थोर नेत्यांच्या हाती महाराष्ट्राचे भवितव्य निश्चित उज्ज्वल आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १६६५८
स्थळ प्रत

# १ : अष्टपैलु नेता

वसंतराव दादा पाटलांना आज महाराष्ट्रात कुणी ओळखत नाही असे नाही. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून कुणी त्यांना ओळखतात, सहकारी चळवळीतील एक मोठे कार्यकर्ते एवढीच ओळख काही जणांना त्यांच्याबद्दल आहे. तर काही लोक वसंतराव दादा हे नाव ऐकल्यासारखे वाटते, असे म्हणतात. तेवढेच ते ओळखतात पण यात या लोकांचा दोष नाही. अगदी परवा परवा पर्यंत दादांचे नाव वृत्तपत्रातून वगैरे कधी फारसे येत नसे. कारण प्रसिद्धी पराङ्मुख दादांनी आपली जाहिरात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कधी केली नाही. तोंडाने बोलण्याच्या कामापेक्षा हातांनी कार्य करण्याकडेच लक्ष देऊन त्यांनी सेवेचे व्रत अखंडपणे चालू ठेवले आहे. पण राजकारणात त्यांच्यावर अधिकाधिक जबाबदारीची पदें येऊ लागली तसे त्यांचे नावही ओघानेच येऊ लागले.

वसंतराव दादांची महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून नेमणूक झाली तेव्हा हे कोण बुवा वसंतराव पाटील? असा प्रश्न राज्यातील आणि राज्याबाहेरील लोकांनी विचारला!

पण दादांनी ज्या भागात प्रत्यक्ष विधायक कार्याची मुहूर्तमेढ केली त्या भागात खेड्यातील एखाद्या शेतकऱ्याला, रस्त्यावरच्या माणसाला त्यांचे नाव विचारले तरी आपले दादा का? या शब्दांत तो उत्तर देईल.

आता सबंध महाराष्ट्रच त्यांना आपले दादा म्हणून ओळखू लागला आहे. दादांचे कार्यक्षेत्र विशाल आहे. ते महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष, कित्येक सहकारी योजनांचे प्रवर्तक आणि अनेक संस्थांचे प्रमुख आहेत. त्यामुळे अनेक लोक वेगवेगळ्या निमित्ताने त्यांच्याकडे येतात. दादांच्या कार्याच्या जादूने भारावून जातात.

बेचाळीसच्या क्रांतीत भूमिगत चळवळीतील एक ज्वलंत क्रांतिकारक दादा, आज स्वातंत्र्यानंतरच्या काळातही नवी क्रांती घडवीत आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळात क्रांतीची मशाल वसंतराव दादांनी पेटविली. स्वातंत्र्योत्तर काळात विधायक कार्याचा– सहकारी चळवळीचा नंदादीप त्यांनी तेवत ठेवला आहे.

या नंदादीपाच्या प्रकाशात कृषी औद्योगिक विकासाच्या ध्येयाकडे वाटचाल जोराने सुरू आहे. सहकारी साखर कारखान्यांनी हे ध्येय साध्य होऊ शकते याची खात्री करून दिली आहे. सामान्य जनांना सुखाचे दिवस येण्याची चिन्हे या क्रांतीत दिसत आहेत. महाराष्ट्रातील शेतकरी कारखानदारीची स्वप्ने या क्रांतीत रंगवीत आहे. दादा या सर्व सामान्य जनांना, शेतकऱ्यांना घेऊन, त्यांच्याच हितासाठी त्यांच्याच बळावर ही नवी क्रांती यशस्वी करू पाहात आहेत.

अशा या स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर दोन्ही युगांतील थोर क्रांतीकारक नेत्याचा परिचय आजच्या तरुणांना निश्चितच स्फूर्ती आणि प्रेरणादायक आहे. अल्पशिक्षित असून ज्ञानी, खेडवळ असून आधुनिक (मॉडर्न) दृष्टीचा, शेतकरी असून उद्योगधंदे शिकविणारा, जाडेभरडा कपडे वापरणारा पण रेशमी स्वभावाचा, वृत्तीने साखर कारखानदारी यशस्वी करणारा अन् वाणीने साखर पेरणारा, दोन हातांमध्ये अनंत हस्तांचे बळ असलेला, असा पद्माळ्याचा पद्मभूषण पाटील म्हणजे एक अत्यंत थोर माणूस.

तो अनेक दृष्टींनी थोर असला तरी माणूस म्हणून सर्वात थोर आहे. माणूस माणुसकी विसरून उठावा अशा आजच्या काळात सामान्य माणसांसाठी, रंजलेल्या, गांजलेल्यांसाठी झिजणारा हा कर्मयोगी आहे. दुनियेच्या बाजारात आज महागाई वाढते आहे. त्यात सर्वात महाग झाली माणुसकी. दादांच्या जवळ या माणुसकीचा जिवंत झरा वाहतो आहे आणि म्हणूनच दादा म्हणजे सामान्य जनांचा असामान्य नेता बनले आहेत.

वसंतराव दादा पाटील या अष्टपैलू नेत्याचा प्रत्येक पैलू म्हणजे पराक्रमाची गाथा आहे.

## २ : दादा ते दादाच

सांगली जिल्ह्याच्या तासगाव तालुक्यातील पद्‌माळे नावाचे छोटेसे गाव. जेथे पाच-पंचवीस घरे आणि शेते एवढेच दृश्य दिसे. ना धड रस्ता, ना दिवाबत्ती. अशा या अगदी लहानशा खेड्यात श्री. वसंत बंडुजी पाटलांचा जन्म झाला. दिनांक १३ नोव्हेंबर १९१७, म्हणजे आश्विन महिन्याची अमावस्या. लक्ष्मीपूजनाचा तो दिवस. अमावास्येच्या त्या रात्री भारताला भविष्यकाळात प्रकाश दाखविणारा एक थोर कार्यकर्ता पद्‌माळ्यात अवतरला. पद्‌माळे हा पद्‌ माळ्याचा अपभ्रंश असावा. त्या पद्‌माळ्यात दादांच्या रूपाने एक असामान्य कलम उगवले. हा पोरगा पुढे संबंध महाराष्ट्रात आणि पुढे कदाचित सबंध भारतातही विधायक कार्याची ज्योत पेटविणारा असा महान्‌ कर्मयोगी होणार असे कुणी त्यावेळी भविष्य वर्तविले असते तर लोकांनी त्याला मुर्खातच काढले असते. आणि खरोखरच जन्म, बालपण आणि आयुष्यात सोसावे लागलेले कष्ट या सर्व गोष्टी दादांच्या बाबतीत लक्षात घेतल्या म्हणजे भविष्याच्या रेषेच्या जोरावर हा माणूस पुढे आला नसून ज्या हातामध्ये या रेषा दैवाने कोरलेल्या असतात त्या हातांच्या आणि त्या मागच्या मनगटाच्या जोरावर हा माणूस एवढ्या महान्‌ पदापर्यन्त पोहोचला आहे असाच निष्कर्ष कुणीही काढील.

पद्‌माळे, हे गाव सांगलीपासून तीन मैलांवर आहे. तेथें आजही दादांचे मोठे घर आहे. दादांचे मोठे बंधु श्री. शामराव पाटील तेथे नेहमी असत. काही वर्षांपूर्वीच त्यांचे निधन झाले. दादा केवळ दहा महिन्यांचे असताना त्यांची आई व वडील दोन्हेही निवर्तले. खरी मायेची पाखर आणि डोक्यावरील छत्र दोन्हींना दादा इतक्या अल्प वयात पोरके झाले. त्यांच्या वडिलांच्या आईने म्हणजे त्यांच्या

आजीने त्यांचे पालन केले. दादांचे तिसऱ्या इयत्ते पर्यन्तचे शिक्षण पद्माळ्यालाच झाले. पुढच्या शिक्षणाची तेथे सोयच नव्हती म्हणून चौथीकरिता तेथून ३ मैलांवर असलेल्या कर्नाळा या गावी त्यांना रोज पायी रपेट करीत जावे लागे. पुढे तेथेही शिक्षणाची सोय नव्हती. म्हणून दादांना सांगलीला शिकण्यासाठी पाठविण्यात आले. ५ वी ते ७ वी पर्यंतचे दादांचे शिक्षण सांगलीस झाले.

दादांचे शालेय जीवन उणे पुरे सात वर्षांचे. पण त्या सात वर्षांत देखील दादांच्या भावी जीवनाला दिशा दाखविणारे काही संस्कार दादांवर झाले. त्या वेळचे एकूण वातावरण आणि दादांचे संस्कारक्षम मन व स्वतंत्र निर्णय घेण्याची त्यांची वृत्ती यामुळेच बाहेरच्या घडामोडींचा त्यांच्या बालमनावरही परिणाम झाला. दादा शाळेत जात होते त्याच वेळी १९२९ साली सोलापूरच्या पाच हुतात्म्यांना फाशी देण्यात आली. या घटनेने सबंध देश हळहळला. भारतीयांची मने अधिक पेटली. स्वातंत्र्य चळवळ फोफावली. महाराष्ट्रात साहजिकपणेच सोलापूरच्या पाच हुतात्म्यांच्या फाशीमुळे ब्रिटिश विरोधाची चळवळ अधिक धारदार झाली. कर्फ्यू, मिरवणुका, प्रभात-फेऱ्या, लाठीहल्ले, हरताळ, हीच चित्रे सर्वत्र दिसत होती. राष्ट्रीय चळवळ इतकी सर्वव्यापी आणि सखोल होती की खादीची टोपी घालणे, उपवास करणे, चहा न पिणे अशा वैयक्तिक वृत्तींमधूनही लोक आपले राष्ट्रप्रेम, देशभक्ती व्यक्त करीत होते. पद्माळ्यासारख्या खेड्यातील लहानशी शाळा. पण तिथपर्यंतही या चळवळीचे वारे पोहोचले होते. दादांसारख्या स्वतंत्र वृत्तीच्या, धाडसी वृत्तीच्या विद्यार्थ्याने चहा सोडणे, खादीची टोपी घालणे, यासारखी व्रते अंगिकारली. स्वदेशी आणि बहिष्कार या चळवळीची बीजे अशा रीतीने दादांमध्ये रुजली. १९३४ साली ६ वी पास झाल्यानंतर १९३५ मध्ये दादा काही दिवस राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचेही स्वयंसैनिक होते. त्यावेळी पुण्याच्या खालोखाल सांगली हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे फार मोठे केंद्र होते. त्यामुळे सहजच ते त्या संघ लोकांकडे ओढले गेले. पण त्याचा प्रभाव त्यांच्या मनावर फार काळ

टिकला नाहीं. त्यानंतर सत्यशोधक चळवळीतही दादा होते. पण त्या चळवळीचे अस्तित्व मागाहून ओसरत आले होते. राष्ट्रव्यापी स्वातंत्र्याच्या चळवळीचा त्यांच्या मनावर सर्वांत जास्त परिणाम होत गेला. १९३७ मध्ये काँग्रेसचे स्वयंसेवक म्हणून ते काम करू लागले. अर्थात् त्यावेळी ते विद्यार्थी दशेत होते. त्यांचे मन आणि बुद्धी घडविली जात होती. फारसे प्रत्यक्ष कार्य करण्याचे ते वय नव्हते.

सातवी पर्यंतच्या शिक्षणानंतर वास्तविक पुढे शिकण्याची खूप इच्छा असूनही त्यांना शिक्षण घेता आले नाही. दादांची वडिलोपार्जित ४५ एकर शेती होती. पण दादा आणि दादांचे भाऊ लहान असल्यामुळे जमीन कोर्ट ऑफ वॉर्डच्या ताब्यात होती. कोर्टाकडून दरमहा आजीला १०, मोठ्या भावाला ८ आणि दादांना ७ रु. मिळत असत. घरात वडिलधारे पुरुष कुणी नाही. म्हणून मामांनी त्यांचा सांभाळ केला मामा मामलेदार कचेरीत कारकून होते. पुढे शिक्षण घ्यावे असे मार्गदर्शन देणारे कुणी नव्हते. त्या काळात खेड्यापाड्यात ६–७ वी पर्यंत शिक्षण म्हणजे डोक्यावरून पाणी गेले अशी एक भावना. तशात त्या वेळी पसरलेल्या प्लेगच्या साथीत दादांचा एक जिवाभावाचा मित्र दगावल्याने दादांच्या बालमनावर खूप परिणाम झाला व त्यांचे शिक्षण वगैरे कशात मन लागेना. खूप निराशा वाटू लागली. या सर्व गोष्टींचा परिणाम म्हणजे दादांनी शिक्षणाला रामराम ठोकला. १९३५ मध्ये त्यांचा भाऊ सज्ञान झाला व त्यांची जमीन त्यांना परत मिळाली. १९३६ व १९३७ ही दोन वर्षे दादांनी फक्त शेतीत लक्ष घातले. शेतावर नांगर धरणे, मोट चालविणे, शेताची निगा राखणे आणि आठवड्याच्या बाजाराला जाणे अशी सर्व कामे दादा मन लावून करीत. गावात एक कष्टाळू आणि मन मिळाऊ शेतकरी म्हणून दादांना लोक ओळखू लागले. निढळच्या घामाने पाच सहा गाड्या जोंधळा आणि बारा एक गाड्या कडबा सहज निघायचा. त्यामुळे थोडे सुखासमाधानात आयुष्य चालले होते. पण बंडखोर मन आता स्वस्थ बसत नव्हते.

शेतीशिवाय काहीतरी उद्योग करण्याची धडपड ते करीत होते. पद्माळे हे तासगाव-वांद्रे रस्त्यापासून जरा दूरवर आहे. पद्माळ्याला जायला चांगला रस्ता नव्हता. पावसाळ्यात वगैरे तर गावाच्या चोहोबाजूला चिखल आणि गाळ साचून मुख्य रस्त्यापर्यंत जाणेच मुष्किल व्हायचे. गाव बाकीच्या प्रदेशापासून जणू तोडला जायचा.

दादांनी गावातले आपल्या वयाचे तरुण सोबती गोळा केले. दिवसा शेती करायची आणि रात्री घाटावर गाळ व चिखल उपसून टाकायचा उद्योग त्यांनी सुरू केला आणि गाळ साफ करून मार्ग मोकळा केला. १९३९ मध्ये तासगाव येथे राष्ट्रीय परिषद भरली होती. त्यावेळी आपल्या गावाला रस्ता व्हावा असा ठराव घेऊन दादा तासगावला गेले होते अशा रीतीने दादांचे बालपण आणि तारुण्याचा सुरवातीचा काळ पद्माळ्याच्या परिसरात गेला. शेताच्या आणि आखाड्यातील मातीत ते खेळले. शेतीत आणि शेतकऱ्याच्या जीवनात ते एकरूप झाले. शेतकऱ्याबद्दलच्या आस्थेचा अंकुर त्याच वेळी त्यांच्या मनात रुजला. कारण ते स्वतः शेतकरी होते. शेतकऱ्यांची, लहान खेड्यापाड्यांची दुःखे, अडचणी काय असतात ते स्वतः त्यांनी अनुभवले. गुढघाभर चिखल तुडवून गावासाठी रस्ता बनविण्याचे काम त्यांनी केले आहे. म्हणूनच खेड्यापाड्यांच्या उद्धारासाठी, त्यांच्या मुलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी त्यांची आज धडपड चालली आहे. दादांचा, खरा शेतकऱ्याचा-पिंड अशा रीतीने त्या वयात तयार झाला. दादांना परिस्थितीमुळे शिक्षण घेता आले नाही. पण आजच्या पिढीतील सगळ्या मुलांना शिक्षण मिळावे, खेडोपाडी शाळा असाव्यात अशी दादांची तळमळ. मला शिक्षण घेता आले असते तर मला आणखी जास्त चांगले कार्य कदाचित् करता आले असते असे दादा कळवळून म्हणतात. अर्थात दादांचे शालेय क्रमिक पुस्तकांचे शिक्षण जरी अपूर्ण राहिले असले तरी जीवनाचा खरा अभ्यास त्यांनी केला आहे. अनुभवाचे महान् ज्ञान त्यांच्या जवळ आहे. प्रत्यक्ष कार्याचे खरे शिक्षण त्यांनी घेतले आहे.

अनेकांना त्यांचे धडे त्यांनी दिले आहेत आणि देत आहेत. तेजस्वी बुद्धिमत्ता, दूरदृष्टी, व्यवहार ज्ञान आणि खडतर परिश्रम यांच्या असामान्य मिलाफापासून त्यांचे व्यक्तिमत्व घडले आहे. ग्रामीण भूमीतून, सामान्य जनांच्या जीवनांतून ज्यांचे नेतृत्व फुलले त्या दादांच्या स्वभावात शेतकऱ्याचा भोळेपणा आणि कितीतरी नम्रता आहे. त्याचबरोबर चाणाक्षपणा आहे. हाती घेतलेले कार्य तडीस नेण्यास लागणारा खंबीरपणा आहे. साधेपणा आहे. आधुनिक दृष्टिकोणही आहे. तो दृष्टिकोण त्यांनी शेतकऱ्यांना आणि सहकारी चळवळीला दिला आहे. व्यवहाराचा दृष्टिकोण आहे. त्याचबरोबर विशाल दूरदृष्टी आहे.

'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेशु कदाचन्' या गीतोपदेशाप्रमाणे ते आज पर्यन्तच्या आयुष्यात फळाची आशा न धरता कार्य करीत आले आहेत. स्वातंत्र्यापूर्वी स्वातंत्र्य संग्रामात आणि स्वातंत्र्योत्तर काळात विधायक कार्यात त्यांनी स्वतःला वाहून घेतले पण पैसा, अधिकार कशाचीही आशा न धरता, त्यांच्याकडे जे काही मोठेपण आले आहे, मोठ्या जबाबदाऱ्या आल्या आहेत, त्या सर्व त्यांच्या कामगिरीचा, कार्यक्षमतेचा परिणाम म्हणूनच. पण ही सर्व पदे स्वीकारताना सत्तेच्या उपभोगापेक्षा सेवेची संधी ज्यात अधिक अशाच जबाबदारीच्या जागा दादांनी स्वीकारल्या आहेत. सत्तेपासून दूर राहून जनसेवा करीत राहण्याचा अट्टाहासाने त्यांनी प्रयत्न केला आहे हेंच त्यांच्या स्वभावाचे खरे वैशिष्ट्य. कामाचा गाजावाजा किंवा प्रसिद्धी यापासून दादा नेहमीच चार पावले दूर असतात. एवढे कशाला मंत्री, उपमंत्री किंवा काँग्रेसच्या बड्यांची एखादी बैठक असली तरी दादा खादीचे धोतर आणि खादीचा नेहरू शर्ट, पायात चपला अशा अत्यंत साध्या वेशातील, कधी मिरवताना, पुढे पुढे येताना, दिसायचे नाहीत. दादा चार पावले मागेच दिसतील. बोलतीलही कमीच. पण जे बोलतील ते मुद्याचे. यामुळेच त्यांची लांबलचक भाषणे किंवा वेगवेगळ्या पोझमधील किंवा वेगवेगळ्या समारंभाचे उद्घाटन करतानाचे फोटोदेखील वर्तमानपत्रातून कधी

दिसत नाहीत. त्या दृष्टीने दादा लाजाळू नव्हे बुजरेही नव्हे तर आपल्या मर्यादा ओळखणारे आहेत. जेथे मूर्ख अर्ध शहाणे घुसतात तेथे शहाणे सबुरी दाखवतात असेच म्हणावे लागेल. नुसता साधा आवाज चढविताना दादांना कुणी ऐकले नसेल. खाजगी बोलण्यातही दादा असेच मृदु, प्रेमळ भाषी. वास्तविक हल्ली त्यांच्यामागे कामाचा इतका डोंगर उभा आहे की चोवीस तासांचा दिवस त्यांना लहानच पडतो. सकाळी पाच वाजता दादा उठतात. साडेसहा वाजेपर्यंत स्नानादि कार्ये उरकून दादा पाऊण एक तास वर्तमानपत्रे वगैरे वाचण्यात घालवितात.

सबंध दिवसात तेवढाच काय तो त्यांना वाचायला वेळ मिळतो. त्यामुळे इतर पुस्तके, ग्रंथ वगैरे वाचण्याची खूप इच्छा असूनही दादांना सवड मिळू शकत नाही. साडेसात वाजता त्यांचा कामाचा दिवस सुरू होतो तो रात्री १२–१ वाजेपर्यंत. वेगवेगळ्या कामा-निमित्त भेटायला येणारे लोक, बैठकी रोजच. कुठल्या ना कुठल्या भागातून येणाऱ्या काँग्रेस कार्यकर्त्यांशी चर्चा, त्यांच्या अडिअडचणी सोडविणे, मार्गदर्शन करणे, शेकडोंनी येणारी पत्रे पाहणे, महत्त्वाच्या पत्रांना उत्तरे देणे यातच दादांचा दिवस कुठे निघून जातो ते कळतच नाही दादांची सकाळची जेवणाची वेळ ठरलेली नसते. कारण कोणती कामे एकदम उपटतील याचा नेम नाही. रात्री साधारण दहा साडेदहाला दादा जेवणासाठी सवड काढतात. त्यानंतरही भेटायला येण्यासाठी काही वेळ दिलेली असतेच. सबंध दिवस असा गडबडीत निघून गेल्यानंतरही महत्त्वाचे कागदपत्र पाहणे, पुढील योजनांचा आराखडा ठरविणे, काँग्रेसमधील काही आपसातील भांडणे मिटविण्याचा मार्ग शोधणे याचा विचार चिंतन करून त्याची टिपणे वगैरे यासारखी स्वतःच करावयाची कामे आटोपून बिछान्याला पाठ टेकतात. रात्रीचे दोन-दोन वाजतात. रात्रीचा दिवस करून सामान्य जनांच्या अंधःकारमय जीवनात प्रकाश पोहोचविण्यासाठी वीस वीस तास पर्यंत जागणारे दादा घड्याळाच्या काट्याप्रमाणे संथपणे पण निश्चितपणे कार्य करीत आहेत. क्षणा-

क्षणाला पुढे जात आहेत. दिसायला अबोल, नम्र, शांत, संथ असा माणूस एके काळी भूमिगत चळवळीतील खंदा लढवय्या, क्रांतीकारक होता आणि आज सबंध महाराष्ट्रातील सहकारी आणि रचनात्मक कार्याच्या नवीन क्रांतीचा प्रणेता आहे हे त्यांच्याकडे पाहून कुणाला खरे वाटायचे नाही. पण दिसायला अशक्य वाटणाऱ्या गोष्टी शक्य करून दाखविण्याची अजब किमया त्यांच्यात आहे. गरीबांच्या उद्धाराचे अवघड, अशक्यप्राय कार्य त्यांनी आरंभिले आहे. म्हणूनच महाराष्ट्रातील जनता त्यांना दादा या प्रेमळ नावाने संबोधते आहे.

दादा अनेक संस्थांचे पदाधिकारी आहेत. कित्येक मंडळांचे अध्यक्ष आहेत. महाराष्ट्रात प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष आहेत.

राष्ट्रपतींनी त्यांच्या महान् कार्याची दखल घेऊन त्यांना पद्म-भूषण हा बहुमानाचा किताब अर्पण केला. दादांचा हा बहुमान झाला तेव्हा सबंध महाराष्ट्राला आनद झाला. दादांचा हा बहुमान म्हणजे पद्माळ्याच्या पाटलांचा बहुमान, एका शेतकऱ्याचा बहुमान. एका स्वातंत्र्यवीराचा बहुमान, एका सहकार महर्ष्यांचा बहुमान. आप-ल्याला पद्मभूषण मिळाल्याचे कळले तेव्हा आपणास काय वाटले असे दादांना विचारले असता, दादा म्हणाले, मीही माणूस आहे. राष्ट्रपती सारख्या आपल्या देशातील सर्वश्रेष्ठ व्यक्तिकडून आप-ल्याला बहुमान मिळाला हे ऐकून बरे वाटले. पण त्याचबरोबर आपली जबाबदारी वाढली आहे. आपण अधिक नेटाने जनसेवा केली पाहिजे अशी जाणीव मला झाली.

या पदास मी लायक नव्हतो, वगैरे वगैरे खोट्या विनयाचे उद्-गार न काढता दादांनी अगदी प्रांजलपणाने मनमोकळेपणाने आपल्याला आनंद झाल्याचे सांगितले. पण त्याचबरोबर आपले कार्य अधिक नेटाने पुढे चालविण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. अनेक अध्यक्षपदे, अधिकाराची पदे, संस्थांची प्रमुखपदे वगैरेपेक्षा जनतेने प्रेमळपणाने त्यांना बहाल केलेले ‘ दादा ’ हे पदच सर्वश्रेष्ठ आहे. एकापेक्षा एक श्रेष्ठ अशा पदांवर दादांची नियुक्ती होत गेली आहे पण आज वीस पंचवीस वर्षांपूर्वी महाराष्ट्राच्या कुठल्याशा

कोपऱ्यातील शेतकऱ्यांचे जे दादा होते तेच दादा आज कायम आहेत आणि यावरही दादा आणखी उच्चपदी गेले तरी दादा ते दादाच राहणार. तेच साधे कपडे, ऐसपैस वागणे, तेच सौम्य, अस्सल मराठी बोलणे, तोच अघळपघळ पांढरा शुभ्र खादीचा नेहरू शर्ट, आवती भोवती तोच शेतकऱ्यांचा, कामकऱ्यांचा गोतावळा. त्यांच्या दिमतीला कदाचित अधिक चार दोन खाजगी चिटणीस असतील, कागदपत्राचा, फाईलींचा ढीग वाढेल, दौरे वगैरे वाढतील. पण या सर्व वाढत्या मदतनीसांचे, कागदपत्रांचे, फाईलींचे लक्ष पूर्वीप्रमाणेच सामान्य माणसाचे हित हेच असणार. त्या दिशेने चाललेल्या प्रवासाची गती फक्त वाढेल.

# ३ : रूढ चाकोरी झुगारणारे समाजसुधारक दादा

दादांचे लग्न काही वर्षांपूर्वी काही लोकांनी एक चर्चेचा विषय बनविला होता. वसंतराव दादा दुसरं लग्न करणार ? आता पन्नाशीच्या घरात आलेल्या या पुढाऱ्याला हे काय सुचलंय ? पहिली बायको हयात असताना दुसरे लग्न ? पहिल्या लग्नाची चार मुले असलेल्या बाईला तरी आता कशाला दुसरं लग्न ? वगैरे अनेक प्रश्न विचारण्यात येऊ लागले. सार्वजनिक कार्यासाठी स्वतःच्या खाजगी ऐषआरामी जीवनाला यत्किंचितही झळ न लागू देणारेही या चर्चेत रस घेऊ लागले आणि सार्वजनिक क्षेत्रातील एका तपस्व्याच्या खाजगी जीवनावर शिंतोडे उडविण्याचे प्रयत्न करू लागले. पण साहस आणि क्रांती ज्याच्या रक्तात भिनली आहे त्या वसंतराव दादांनी चालीरीतीची रूढ चाकोरी झुगारून देऊन घेतलेला तो खंबीर निर्णय होता. सत्य आणि आपल्या संस्कृतीची शाश्वत मूल्ये यांना यत्किंचितही धक्का न लागणारा. उलट फुले, आगरकर आणि महर्षि कर्व्यांचे नाव उज्वल करणारा तो धाडसी निर्णय होता. वसंतराव दादांना लग्नाचा विचार करतांना या सर्व संभाव्य वावटळींची कल्पना आलीच होती. पण अशा वावटळींनी हादरणारा हा दीपस्तंभ नव्हता. अशा कित्येक वादळी वाऱ्यांना त्याने टक्कर दिली आहे. आणि तो दीपस्तंभ आजही सर्वांना मार्गदर्शन करीत आहे. सतीच्या शीलाचाही संशय घेणारे लोक समाजात असतात. मग दादांच्या दुसऱ्या लग्नाबद्दलची चर्चा करणारे महाभाग समाजात निघाले यात नवल नाही. पण दादांच्या या विवाहाची हकिगत पूर्णपणे लोकांना कळली तेव्हा या थोर क्रांतीकारक समाजसुधारकापुढे आणि सौ. शालिनीबाई पाटील यांच्यापुढे ते नतमस्तक झाल्याशिवाय राहात नाहीत.

दादांचे पहिले लग्न १९३९ साली त्यांच्या मामांची मुलगी मालतीबाई हिच्याशी झाले. दादांचे आणि मामांचे संबंध फार वेगळे होते. त्यांचे मामा हे दादांना वडिलस्थानी होते. दादांचे आई-वडील लहानपणीच दादांना सोडून गेलेले.

दादांचे आणि त्यांच्या भावंडांचे पालनपोषण करण्याचे फार मोठे उपकार मामांनी त्यांच्यावर केले. मामा मामलेदार कचेरीत कारकून होते. त्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थितीही फार चांगली होती असे नाही. परंतु तरी देखील त्यांनी दादांचे व त्यांच्या भावंडांचे संगोपन केले. आई वडिलांची उणीव पोरांना भासू दिली नाही. मामांची मुलगी मालतीबाई आधीपासून थोडी वेडसर. बुद्धीनं यथा-तथा. मामांपुढे या मुलीचे लग्न जमविण्याचा मोठा प्रश्न होता. त्यामुळे दादांशीच तिचे लग्न झाले तर बरे असे मामांना वाटे. मामांनी आपली ही इच्छा बोलून दाखवली. दादांच्या आजीचाही वास्तविक या लग्नाला विरोध होता. पण मामांचा शब्द मोडणे दादांना शक्य नव्हते. स्वतःचा विचार त्यांनी दूर ठेवला. आपल्या वैयक्तिक आशाआकांक्षा गौण मानून मामांचे त्यांच्यावर जे अनंत उपकार होते त्यांची परतफेड करण्याची जबाबदारी दादांना अधिक महत्त्वाची वाटली. त्यांनी होकार दिला. आणि दादांचे लग्न झाले. दादांचा सार्वजनिक कार्याचा गाडा नेटाने पुढे चालला होता. स्वातंत्र्य लढ्याच्या अग्नीकुंडात ते उतरले होते. लढा, मोर्चे, भूमिगत कार्य आणि तुरुंगवास. अखंड भारताच्या उध्वस्त संसाराची घडी बसविण्यासाठी लढणाऱ्या दादांना स्वतःच्या संसाराकडे लक्ष द्यायला उसंत नव्हती.

१९४७ साली दादांना पहिला मुलगा झाला. मुलाचे नाव प्रकाश ठेवले. दादांच्या सांसारिक जीवनात नवीन प्रकाश आला पण ह्या पुत्रप्राप्तीच्या आनंदाबरोबर दुःखाचा मोठा आघातही दादांच्या नशिबी लिहिला होता. आधीच वेडसर असलेल्या मालतीबाई या बाळंतपणानंतर पूर्णपणे वेड्या झाल्या. दादांनी अनेक उपचार केले. डॉक्टर, वैद्य, हकीम, सर्वांचे उपाय थकले. परंतु लाखो गोरगरिबांचे

१६६५८

संसार सुखी करणाऱ्या वसंतरावांच्या संसारात जणू सुख हा शब्द नियतीने लिहिला नव्हता. मालतीबाईंचा सुधार असाध्य ठरला. दादांना अनेक मित्रांनी, खुद्द सासऱ्यांनीदेखील दुसरे लग्न करण्याचा सल्ला दिला.

पण दादा म्हणत मालतीबाई ऐवजी मी वेडा झालो असतो तर त्यांनी मला टाकले असते का ? आणि दादांनी पुनः लग्न करण्यास स्पष्ट नकार दिला. १९६४ सालपर्यंत दादांच्या मनाला दुसरे लग्न करण्याचा विचार कधी शिवला नाही. १९४७ ते १९६४-जवळ जवळ १७ वर्षांचा काळ असाच गेला. वैयक्तिक सुखासाठी, लग्नासाठी लग्न ज्याला करायचे तो सतरा वर्षे वाट पाहील काय ? दादांना तर नातेवाईक आणि मित्रमंडळीच दुसऱ्या लग्नाचा आग्रह करीत होती. आणि दादाच नकार देत होते.

पण या नकारामागे बोच असे. दादांच्या शुक्लेंदुवत वाढणाऱ्या व्यक्तिमत्वाचा, नेतृत्वाचा अपुरेपणा त्या नकाराच्या वेळीच प्रगट झाल्याशिवाय राहात नव्हता. ऐकणारालाही वाटे की ही पोकळी जर चांगल्या रितीने सहज भरून निघाली तर किती बरे होईल—

आणि तसा अकस्मात योग आला, की ज्या क्षणाला एका मित्राच्या कोसळत्या संसाराला सावरण्याच्या मित्रकार्याबरोबरच दादांना आपला मोठा व्याप आणि व्यक्तिमत्व सांभाळू शकेल अशी जोडीदारीण मिळण्याचा तो योग होता.

दादांच्या सध्याच्या द्वितीय पत्नी शालिनीबाई यांचा तोपर्यंत दादांशी किंवा दादांच्या घराण्याशी परिचय नव्हता. शालिनीबाईंचा पहिला विवाह श्री. जाधव यांचेशी १९५० मध्ये झाला. श्री. जाधव शिक्षक होते. १९५० ते १९५७ ते कोल्हापूरला शिक्षक होते. शिक्षकाच्या पेशात संसाराचा गाडा रेटणे कठीण म्हणून श्री. जाधव यांनी एल्एल्. बी. व्हायचे ठरविले. श्री. जाधवांची वकिली चांगली चालू लागली. त्यांना मदतीला आणखी एका माणसाची गरज भासू लागली. श्री. जाधवांनी शालिनीबाईंनाच एल् एल्.बी. ची परीक्षा द्यायला सांगितले. आणि शालिनीबाई

मराठी ग्रंथ ...
अनुक्रम ... दि: ...
क्रमांक ... नों दि: ...

घर, संसार, मुलेबाळे हा सर्व संसाराचा कारभार सांभाळूनही १९६३ मध्ये एलएल्. बी. पहिल्या प्रयत्नात पास झाल्या. एकमेकांनी एकमेकांना खरोखरच आधार देत एक तप संसाराचा गाडा सांवरला. आता कुठे गाडी रूळावर आली असे वाटले. परंतु दैवाला जणू त्यांचे हे सुख पाहवले नाही आणि जाधवांवर रोगाने झडप घातली. सांगलीला औषधोपचार झाले. मुंबईचे हेलपाटे सुरू झाले. मध्यतरीच्या काळात शालिनीबाईंना स्त्री संघटक म्हणून नोकरी मिळाली. श्री. जाधवांची प्रकृती बिघडली तेव्हा चार मुले आणि नवराबायकोचा संसार सांभाळण्यासाठी शालिनीबाईंना नोकरी पत्करणे भाग पडले. त्यांची सांगलीहून बदली झाली होती. परंतु श्री. जाधवांचा आजार आणि मुलेबाळे, संसार यासाठी सांगलीलाच आपल्याला कायम ठेवावे अशी खटपट करण्यासाठी शालिनीबाई श्री. वसंतराव दादांच्या भेटीला गेल्या. दादांनी शालिनीबाईंची हकिगत ऐकली. दादांचे मन हेलावले. त्यांना दया आली. दादांची आणि शालिनीबाईंची ती पहिलीच भेट. दादांनी त्यांना सांगलीलाच ठेवण्याची व्यवस्था तर केलीच पण श्री. जाधवांना औषधोपचार करण्यातही दादांनी खूप साहाय्य केले. श्री. जाधव यांना मुंबईस आणण्यात आले. ३० वेळा त्यांना रक्त देण्यात आले. पण मानवी प्रयत्नापेक्षा दैवाचा खेळ वरचढ ठरला आणि १ जुलै १९६४ रोजी श्री. जाधव यांनी शालिनीबाई आणि चार पोरांना मागे टाकून जगाचा निरोप घेतला. शालिनीबाईंवर दुःखाचा डोंगर कोसळला. कष्टाने मांडलेला संसाराचा डाव क्रूर दैवाने निर्दयपणे उधळून टाकला. शालिनीबाईंचा चार कच्च्या बच्चांचा संसार वाऱ्यावर पडला. दादांचा आणि शालिनी बाईंचा परिचय साहजिकच वाढला होता. त्यांतून सहानुभूती आणि आपुलकी निर्माण झाली. दादांनी एकदा शालिनीबाईंना विचारले, 'आपण शिकलेल्या, सुबुद्ध, सुविद्य आहात. आपण पुनः लग्नच का करीत नाही?'

'मी समजा तयार आहे परत लग्न करायला. पण आजच्या

समाजात चार मुले असलेल्या माझ्यासारख्या विधवेशी कोण लग्न करायला तयार होणार?' शालिनीबाईंनी उत्तर दिले. दादा त्यावर म्हणाले, 'मी तयार आहे. आपण विचार करा. आपल्या मनाला पटत असेल तरच होकार द्या.' आणि मग १ फेब्रुवारी १९६५ रोजी दादांचा शालिनीबाईंशी विवाह झाला. दादांना दुसरे लग्न करण्याचा सल्ला देणारांनाच हा पुनर्विवाह मात्र आवडला नाही. सुधारणा व्याख्यानात, त्याची हवा घरात नको. अशा मंडळींपेक्षा दादांनी आपले व्यक्तिमत्व निराळे आहे, क्रांतिकारक आहे, बोलके नाही असे सिद्ध केले. त्याचबरोबर पहिल्या विवाहात पत्करलेली जबाबदारीही त्यांनी सांभाळलेली आहे.

शालिनीबाईंचे बंधु श्री वसंतराव फाळके सातार्‍याला वकील आहेत. त्यांनीही या लग्नाला संमती दिली होती. पण सीतेच्याही शीलाचा संशय घेणाऱ्या परिटाच्या क्षुद्र मालिकेतील लोक मात्र नाना तऱ्हेच्या शंका घेत होते. आपण स्वतः असा आदर्श निर्माण न करता थोर पुरुषांच्या चारित्र्याबद्दल चर्चा करून स्वतःची करमणूक करून घेणारे रिकामटेकडे आणि ढोंगी लोक!

दादांनी हे लग्न करण्याचा निर्णय घेतला तेव्हा आपल्याला सार्वजनिक जीवनातून उठावे लागेल अशी भीतीही त्यांना दाखविण्यात आली. पण दादांनी त्याला काडीचीही भीक घातली नाही. दादांनी सांगितले, 'मी विचारपूर्वक निर्णय घेतला असून त्यात मी काहीही वाईट करीत नाही असे माझे अंतर्मन मला सांगत आहे. इतके असूनही जर समाजाला सार्वजनिक जीवनात केवळ या निर्णयासाठी मी नको असेन तर ती शिक्षा भोगायला मी तयार आहे.'

माझ्या मनात विचार आला की संयमी दादांचा हा विवाह काही उच्छृंखल तारुण्याचा खेळ नव्हे मग हे का घडले? समाजाला दुसरे लग्न मान्य पण पुनर्विवाह अजूनही अमान्य असे का? पण या सर्वांपेक्षा दादांच्या प्रचंड व्यापाने भरलेल्या जीवनात व्यक्तीच्या अंतर्यामात एक अपूर्णता, पोकळी घर करून होती. ती रास्त संधी आल्याबरोबर भरून काढण्याचीही स्वाभाविक उर्मी होती असे


मला वाटते. चोविस तास श्रमणारा, खपणारा हा मुशाफिर जेव्हा दमतो विसाव्यासाठी भोवती पाहतो तेव्हा त्याला आपण एखाद्या धर्मशाळेत वा आलिशान हॉटेलात पण एकटा आहोसे वाटते– समाजाने त्या एकलेपणाची जाणीव करून घेतली असती तर दादांच्या दुसऱ्या विवाहाबद्दल एवढी ओरड झाली नसती पण शेवटी हे पेल्यातले वादळ ठरले. शालिनीताईंनी ते आपल्या शालीनतेने तसे ठरविले. दादांचे जीवन पूर्ण केले. यात मित्रांनाही आता आनंद वाटत आहे. दादांनीही आपुला निश्चय विचार विवेकावर ठाम केला होता याची खात्री झाली.

सार्वजनिक क्षेत्रांतील दादांच्या कर्तृत्वाला, विवाहबंधनामुळे खीळ बसेल अशीही जी एक भीती व्यक्त करण्यात येत होती, ती देखील सर्वथैव निराधार ठरली एवढेच नव्हे तर दादांचे सार्वजनिक क्षेत्रातील कर्तृत्व खरे फुलले ते त्यांच्या लग्नानंतरच ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. दादांच्या वैयक्तिक जीवनात जी एक पोकळी होती ती भरून निघाल्यानेच त्यांच्या सार्वजनिक जीवनातील कर्तृत्वालाही बहर आला. योगायोग असेल पण दादांना पद्मभूषण पदवी मिळाली ती लग्नानंतर. दादा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष झाले तेही लग्नानंतर आणि त्यानंतर परवाच ते महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे अध्यक्षही झाले. दादांच्या घरातील शालिनीबाईंचे आगमन हे खरोखर शुभलक्षणी आगमन ठरले आहे.

भूमिगत चळवळीत, सहकारी चळवळीत राजकारणात क्रांतिकारक निर्णय घेणाऱ्या दादांचा दुसऱ्या लग्नाचा, विधवा स्त्रीशी पुनर्विवाह करण्याचा निर्णय तितकाच किंबहुना त्याही पेक्षा अधिक क्रांतिकारक आणि समाजसुधारक असल्याची आता सर्वांची खात्री पटते आहे. दादांच्या पहिल्या पत्नीपासून मुलगा प्रकाश आणि शालिनीबाईंच्या पहिल्या लग्नाची चार मुले, दोन मुलगे आणि दोन मुली सर्वजण सांगली येथे एकेच ठिकाणी गुण्यागोविंदाने एकत्र रहात आहेत. दादा त्यांची कोणत्याही प्रकारे हेळसांड होऊ देत नाहीत. अधून मधून ते स्वतः सांगलीला जात असतात. सांगलीला गेल्या-



श्री. वसंतदादा व सौ. शालिनीबाई पाटील




**कुटुंब-परिवारासह दादा**

डावीकडून : चि. प्रकाश, चि. विजया, चि. राजू, चि. शोभा, चि. नंदू व त्यांचा पुतण्या चि. विश्वास उभे असून मध्यभागी दादा व सौ. शालिनीबाई.



दादाचे कर्तृत्व मिनाराच्या उंचीपेक्षांही उत्तुंग आहे आणि त्यांच्या या महान् कर्तबगारीला सौ. शालिनीबाईंची साथ देखील कारणीभूत आहे.



शालिनीबाई स्वतः देखील समाजकार्यांत हिरीरीने भाग घेतात.

नंतर मुलांच्या बरोबर ते राहतात. त्यांच्या अभ्यासाची त्यांच्या प्रकृतीची, त्यांच्या सुखसोयींची चौकशी करतात. त्यांना काय हवे असेल त्याची व्यवस्था करतात. शालिनीबाईही अर्थात दादांबरोबर असतात.

शालिनीबाई म्हणजे अनेक दुःखाचे आघात शांतपणे सहन करणाऱ्या भारतीय स्त्रीचे प्रतीक. श्री. जाधवांबरोबर लग्न केल्यानंतर शिक्षण आणि संसार असा दुहेरी गाडा अत्यंत प्रतिकूल आर्थिक परिस्थितीतही सावरण्यासाठी त्यांनी जीवाचे रान केले. त्यांतूनच जरा कुठे तोंड वर निघते असे वाटते, तो जाधवांना प्रदीर्घ आजाराने घेरले आणि अखेर त्यातच त्यांचा अंत झाला. शालिनीबाईंना चोहोकडे नुसता अंधार दिसत होता. अशा दुःखद प्रसंगातही दादांसारख्या बंडखोर आणि बेडर पुरुषाने त्यांना हात दिला तेव्हा समाजातील लोकांनी आरडाओरड केली. शालिनीबाईंनी हा सगळा मनःस्ताप शांतपणे, निमुटपणे सहन केला. दादा आज सार्वजनिक जीवनांत संपूर्णपणे गुंतलेले आहेत. त्यांच्या घरची जबाबदारी शालिनीबाई खंबीरपणे सांभाळत आहेत. दादांच्या कीर्ती कर्तृत्व-मंदिराला आधारभूत होत आहेत.

दादांना शेकडोंनी भेटायला येणाऱ्यांची व्यवस्था ठेवणे, त्यांच्या गांठीभेटी, बैठकी, दौरे यांची नोंद ठेवणे, दादांचा पत्रव्यवहार पाहणे आणि सार्वजनिक जीवनाला वाहून घेतलेल्या दादांची वैयक्तिक काळजी घेणे ही सर्व कामे शालिनीबाई करीत असतात. खाजगी आणि सार्वजनिक समारंभांना दादा शालिनीबाईंना बरोबर नेल्याशिवाय राहात नाहीत. समाजातील दांभिक प्रवृत्तींची पर्वा न करता ज्या दादांनी शालिनीबाईंना आपल्या खाजगी जीवनात पत्नीचे पवित्र स्थान दिले ते दादा जाहीररीत्या पत्नीला आपल्या शेजारचे मानाचे स्थान देण्यास यत्किंचितही संकोच बाळगत नाहीत. वसंतराव दादा पाटील म्हणजे. म. फुले, आगरकर, कर्वे आणि डॉ. आंबेडकर यांच्यासारखा समाजाच्या डोक्यातील जुनी जळमटे काढून डोळ्यात झणझणीत अंजन घालणारा, वास्तव दृष्टीचा आणखी एक थोर समाजसुधारक होय हे उशीरा का होईना, समाजाला पटले हे समाजाच्या पुरोगामीपणाचेच द्योतक आहे.

# ५ : बेचाळीसचा बेडर क्रांतीवीर

हुश्शा...र. काळ्या पत्थराच्या भिंतीआड, भयाण वातावरणात सांगलीच्या तुरुंगात पहारेकऱ्यांची ललकारी चारी दिशांला घुसली आणि वातावरणातील भयाणता अधिकच तीव्रतेने जाणवू लागली. पहारेकऱ्यांची ही मधूनच येणारी ललकारी आणि पहारा करताना त्यांच्या बुटांचा येणारा कर कर आवाज याशिवाय कसलाच आवाज ऐकू येत नव्हता. पहारेकरी डोळ्यांत तेल घालून पहारा करीत होते. त्यांच्या बंदुकीच्या टोकांना लावलेल्या धारदार संगिनी चकाकत होत्या. तुरुंगाभोवती कडेकोट पहारा होता. ब्रिटिश अधिऱ्यांचा तसा खास हुकूमच होता. तुरुंगाच्या उंचच्या उंच भिंतीपलीकडे बेचाळीसच्या क्रांतीतील एक सिंह त्यांच्या तावडीत सापडला होता तो तुरुंगात होता तरी त्याच्याकडे पाहून पहारेकऱ्याला घाम फुटत होता. भूमिगत चळवळीतील या क्रांतिवीराचे नाव ऐकून ब्रिटिशांना कापरे भरत होते. ब्रिटिशांनी कित्येक दिवस जंगजंग पछाडले. सातारा जिल्ह्याचा आणि आसपासच्या भागाचा कोपरान् कोपरा त्यांनी शोधून काढला. पण हा क्रातीवीर काही ब्रिटिशांच्या हाती लागेना एक आगगाडी उडविल्याच्या वहिमावरून ब्रिटिशांनी या इसमास पकडून देणाऱ्याला बक्षिसही देण्याचे जाहीर केले होते. पण कशाचा उपयोग झाला नाही. शेवटी फितुरीने पोलिसांच्या हाती हा तगडा गडी सापडला. तेव्हा त्याच्यापाशी एक टाईम बॉम्ब, काही स्फोटक द्रव्ये, काही पिस्तुले, काही बंदुका असा भरगच्च मालमसाला सापडला.

सिंह जाळ्यांत पण त्याचे मन तुरुंगाच्या भिंतीच्या पलीकडे मुक्त जगात स्वैर संचार करणाऱ्या पाखरांसारखें भिरभिरत होतें. पंचवीस वर्षांच्या त्या तरुणाचे लाल मातीच्या आखाड्यात घुमून

पिळदार बनलेले, लोखंडाच्या कांबीसारखे दंड तुरुंगाच्या बेड्या तोडण्यासाठी फुरफुरत होते. आख्या ब्रिटिश सत्तेशी झुंजण्याची तयारी त्या बेगुमान मनाने केली होती. भवितव्याची यत्किंचितही तमा या बेफिकीर मनाला नव्हती.

तुरुंगाचा पहारा तोडून बाहेर पडण्याचा धाडसी विचार त्याचे बहाद्दूर मन करीत होते. चलेजावच्या चळवळीने बेहोश झालेल्या त्या तरुणाने एकच निर्धार केला होता. करेंगे या मरेंगे. स्वातंत्र्याची नशा त्याला चढली होती. तो तरुण म्हणजेच आजचे सहकार महर्षि श्री. वसंतदादा पाटील. बेचाळीसचे क्रांतीवीर वसंत पद्माळकर पाटील. १९३९ पासून काँग्रेसचे कार्यात दादा सक्रिय भाग घेऊ लागले होते. एवढेच नव्हे तर तालुका काँग्रेसचे अध्यक्षपदही त्यांना मिळाले होते. दादा काँग्रेसच्या कार्यात हिरीरीने भाग घेऊ लागले होते. १९४२ चे भारताच्या इतिहासातील क्रांतीकारक साल उजाडले. मुंबईत भरलेल्या अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या बैठकीत चलेजावची गर्जना महात्मा गांधींनी केली आणि सबंध देश गांधीजींच्या पाठीशी उभा राहिला. पुढे लगेच गांधीजींसकट सर्व मोठ्या पुढाऱ्यांना अटक करण्यात आली. पुढाऱ्यांना डांबले म्हणून काही चळवळ थांबली गेली नाही. उलट ती अधिकच फोफावली. बाहेर राहिलेल्या लहान पुढाऱ्यांनी जनतेला मार्गदर्शन केले त्यात सांगली जिल्ह्यात दादांचे कार्य अर्थात महत्त्वाचे होते. पण फोफावलेल्या चळवळीबरोबर ब्रिटिशांचे अत्याचारही वाढू लागले. १९४२ मध्ये सांगलीत एक प्रचंड मोर्चा काढण्यात आला. मोर्चाच्या बंदोबस्तासाठी सशस्त्र पोलिसांच्या पलटणीच्या पलटणी शहरात हिंडत होत्या. तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्री कुऱ्हाडे हे होते. तालुक्याचे ठिकाण म्हणून त्यांनी परत मोर्चा मामलेदार कचेरीवर न्यायचे ठरविले होते. यावेळी शिंदे नावाच्या कार्यकर्त्याला अटक करण्यात आल्यामुळे वातावरण खूपच गंभीर बनले होते. चळवळ उग्र स्वरूप धारण करीत होती. ठिकठिकाणी मोर्चे आणि सत्याग्रहांना जोर चढत होता. खटाव तालुक्यात वडूज आणि इस्लामपूर येथे

असेच मोर्चे काढण्यात आले. ब्रिटिशांच्या जुलमी सरकारने मोर्चा- तील लोकांवर गोळीबार केला. या गोळीबारात वडुजला नऊ माणसे आणि इस्लामपूरला दोन माणसे ठार झाली. कित्येक लोक जखमी झाले. सबंध महाराष्ट्र तडफडत चिडला. लोक भयंकर संतत झाले. दादांच्याही तळपायाची आग मस्तकाला गेली. सूडाची भावना बळावली. दादांसारखे काँग्रेसमध्ये आणखीही कित्येक तरुणगडी होते. त्यांचेही रक्त सळसळले. बाहु स्फुरले. सर्वजण एकत्र आले. मन स्वस्थ बसू देत नव्हते. ब्रिटिशांची दडपशाही वाढत होती. उघडपणे विशेष कार्यही करता येण्यासारखे नव्हते. पोलिस सतत पाळतीवर होते. सर्वांनी निश्चय केला. तिरंगी ध्वजास साक्ष ठेवून भारत मातेची शपथ घेतली आणि छत्रपतींच्या महाराष्ट्रांतील या शूर- मर्दांनी गनिमी काव्याने लढण्याचा निर्धार केला. कऱ्हाडमधून यशवंतराव चव्हाण, वाईच्या खोऱ्यांतून किसनवीर, पांडुमास्तर, सांगलीतून वसंत दादा पाटील आदि अनेक भूमिगत कार्यकर्ते तळ- हातावर शीर घेऊन बाहेर पडले. वसंत दादा पाटलांच्या गटाने ब्रिटिश पोलिसांना सळो की पळो करून सोडले. निमणीचा डाक बंगला, भिलवडी जासगावचे पोस्ट, आलकुड सोनी, पाटगांवचे दारूगुत्ते, वांद्रे विश्रामबागचे रेल्वे स्टेशन अशा अनेक ठिकाणी धाडी घातल्या. पांडुमास्तर हे त्या वेळचे एक आघाडीचे भूमिगत कार्यकर्ते. ते देखील वसंत दादा पाटलांचा आदर्श ठेवण्यास इतरांना सांगत. पुढे पांडुमास्तर आणि त्यांचे काही साथीदार पकडले गेले. आणि येरवड्याच्या तुरुंगांत त्यांची रवानगी झाली. परंतु काही दिवसांतच पांडु मास्तर आणि त्यांचे साथीदार तुरुंग फोडून निसटले. बातमी विद्युत वेगाने पसरली भूमिगत कार्यकर्त्यांना आणखी स्फुरण चढले. पांडु मास्तरांनी वसंत दादांना बोरगांवच्या रानात भेटायला बोला- वले. मसूरच्या वाडीतील उभ्या पिकात या दोन क्रांतीकारांची भेट झाली. भूमिगत चळवळीला आणखी उग्र स्वरूप देण्याचा निर्धार या दोन देशभक्तांनी केला. त्यासाठी कुरळप येथे सर्व भूमिगत कार्यकर्त्यांची बैठक बोलावण्याचे ठरले. परंतु पोलिसांना कुठून तरी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ........ दि: ........

 क्रमांक ........ नों दि ........

ही बातमी लागली आणि ते पाळतीवर राहिले. भूमिगत कार्यकर्त्यांची हेरगिरीही काही कमी नव्हती. वसंतराव दादांनाही ते कुरळपकडे निघाले असतांना ही बातमी लागली. त्यांच्या तुकडीने त्यामुळे वाटेतच बेत बदलला. कुरळपकडे जाण्याऐवजी त्यांनी कोल्हापूरलाच खाणावळीत मुक्काम ठोकला.

काही कार्यकर्ते कुरळपला पोहोचलेही-कारण त्यांना पोलिस पाळतीवर असल्याची बातमी लागली नव्हती त्यांना अटक करण्यात आली. दादा ज्या खाणावळीत उतरले होते तेथेही अखेर पोलीस पोहोचले. दादांना आणि त्यांच्या साथीदारांना पकडण्यात आले. परंतु दादांनी आपण या भूमिगत चळवळ्यांच्या गावचेच नाही अशी बतावणी केली. पोलिसांकडेही दादांचा फोटो वगैरे नसल्यामुळे त्यांना दादांची खात्रीने ओळख पटेना. गावात आपले एक पाहुणे राहात असून त्यांच्याकडे आपल्याला जेवायला जायचे होते असे दादांनी सांगितले व निदान त्यांच्याकडे जाऊन तरी येऊ द्या अशी पोलिसांना विनंती केली. दादांना परवानगी देण्यात आली व त्यांच्या बरोबर एक पोलिस देण्यात आला. दादा त्या पोलिसाच्या हातावर तुरी देऊन निसटले. पोलिसांनी जंग जंग पछाडले. पण दादांना ते पकडू शकले नाहीत. सांगलीत फौजदार गल्लीत दादांनी भूमिगतांचे एक केंद्र बनविले होते. भूमिगत चळवळीला मार्गदर्शन आणि प्रेरणा दिल्याशिवाय त्यावेळी पसरलेल्या कॉलऱ्याच्या साथीच्या वेळी भूमिगत कार्यकर्त्यांना लस टोचणे यासारखी कामेही दादांनी तेथे सुरू केली होती. पण पुढे पोलिसांना या ठिकाणाचा सुगावा लागला आणि दादांना त्याच ठिकाणाहून अटक करण्यात आली. दादांच्या बरोबर त्यांचे साथीदारही पकडले गेले. त्यांना सांगलीच्या जेलमध्ये ठेवण्यात आले आणि त्यांच्यावर खटला भरण्यात आला. दादांना तुरुंगात चैन पडेना. येरवडा तुरुंग फोडून पळालेल्या पांडू मास्तरांचा आदर्श त्यांना दिसत होता. खटल्याच्या निकालाची तारीख जवळ येत होती. निकाल काय लागणार हे ठरलेलच होते. पण निकाल लागण्यापूर्वी काही तरी करणे त्यांना आवश्यक वाटत होते. शेवटी बेत

पक्का केला. शनिवारी निकाल लागणार होता तो त्यांनी वकिलास सांगून सोमवारपर्यन्त पुढे ढकलून घेतला. त्याच शनिवारची ही गोष्ट. दादांचे मन तुरुंगातून बाहेर पडण्यासाठी शरीराला आतून धडक देत होते आणि त्याचाच जणू आवाज ठोक्याच्या रूपाने छातींत ऐकू येत होता. शनिवारी सांगलीचा बाजार भरत असे. तुरुंगातील बरेच पोलिसही त्यादिवशी बाजाराला गेले असल्यामुळे तुरुंगात त्या मानाने पोलीस कमी होते. सर्व कैद्यांना सकाळ-संध्याकाळ शौचास एकत्र नेण्यात येत असे. त्या दिवशी संध्याकाळच्या वेळी असेच सर्वांना घेऊन जाण्यात येत असतांना दादांच्या साथीदारांनी ' पोलिसांनी आमच्या दादांना मारले, दादांना मारले ' असा उगाचच गलका सुरू केला. तुरुंगातील पोलीस काय अचानक भानगड आहे म्हणून तिथे जमले आणि ते अशा गोंधळलेल्या मनस्थितीत असतांनाच दादांनी आणि त्यांच्या साथीदारांनी त्यांच्यावर हल्ला चढवला. काय होतंय काय नाही हे कळायच्या आत पोलिसांच्या हातांतील बंदुका हिसकावल्या गेल्या. दादा तुरुंगाच्या तटावर बंदुका घेऊन उभे राहिले आणि साथीदारांना भराभर तटावरून उड्या मारून पळायला सांगितले. सर्व साथीदार निसटले आणि शेवटी दादांनीही तटावरून उडी मारली. पण या धाडसात त्यांचे एक साथीदार श्री. हिंदुराव पाटील उडी मारताना पडले व त्यांचे पाय मोडले. त्यांना पळता आले नाही आणि ते शेवटी पोलिसांच्या ताब्यात सापडले. दादा व त्यांचे साथीदार मात्र पळाले. तुरुंगातून सिंह निसटल्याची बातमी ब्रिटिश अधिकाऱ्याला सांगायला पोलिस गेला तेव्हा त्याची बोबडीच वळली बातमी ऐकून ब्रिटिश अधिकारी जळफळत ताडकन् उभा झाला, बंदुकधारी पोलिसांची, जीप गाड्यांची आणि मोटारींची एकच धावपळ सुरू झाली. बिनतारी तारायंत्रे आणि टेलिफोनवरून भराभर संदेश दिले गेले. वसंत पाटील निसटला. बातमी ऐकणारा प्रत्येक पोलिस अधिकारी तोंडाचा चंबू करून आश्चर्याने ऐकतच राहिला. सगळी पोलिस फौज सज्ज झाली आणि वसंतराव पाटील आणि त्यांच्या साथीदारांचा पाठलाग सुरू झाला. बंदुकींच्या फैरीवर फैरी

झडत होत्या. पोलिसांच्या बंदुकीच्या गोळ्यांना गोळ्यांनी उत्तर मिळत होते. जिवावर उदार झालेला वसंत पाटील आणि त्याचे साथीदार पोलिसांना चुकवीत, हुलकावण्या देत पळाले. बरोबर एकोणिस बंदुका होत्या. पण बेत बांधलेल्या आडाख्यात किंचित फरकाने चुकला आणि वसंता पाटील पलीकडे दुबाजूला नदी आणि समोर सशस्त्र पोलिस अशा अडचणीत सापडला. घेरला गेला. प्रसंग बाका होता. पोलिसांच्या बंदुकी आग ओकित पुढे येत होत्या. सर्वांचे जीव धोक्यात होते. साथीदारांना तब्बल तीन तास होते. एकेक पाऊल पुढे टाकताना पोलिसांच्या पोटातही धस्स होत होते. कितीतरी वेळा एक पाऊल पुढे टाकून पाच पावले ते मागे पडत होते. तीन तासांच्या त्या घन-घोर संग्रामानंतर काडतुसे संपली आणि पाटलांचा नाईलाज झाला. तरी देखील नेमबाजीची हूल दाखवीत या सांगलीकर पाटलाने दहा-पाच मिनिटे निभावलीच. पण एव्हांना पोलिसांना काय ते उमगले होते. एक फैर झडली आणि झाडाच्या निवाऱ्याने लढणारा निशस्त्र वसंत पाटील खांद्यात गोळी घुसून घायाळ झाला. सिंह पुनः जाळ्यात सापडला: सांगलीच्या कोर्टात पाटलांना पोलिसांच्या बंदो-बस्तात घेऊन जाण्यात येत असे तेव्हा या वीर बहाद्दराला पाहण्या-साठी लोकांच्या झुंडी लोटत होत्या. त्याच्या दर्शनाने तरुणांचे बाहु स्फुरण पावत असत. एकाहून एक भयंकर आरोपांवरून त्यांना शेवटी चौदा वर्षे सक्त मजुरीची शिक्षा झाली. येरवड्याच्या तुरुंगात पाटलांना एकट्यांना एकदाचे डांबण्यात आले. तुरुंगातदेखील ब्रिटि-शांनी त्यांना सूडबुद्धीने वागविले. देशाच्या स्वातंत्र्यासाठी देशभर फोफावलेल्या 'छोडो भारत' चळवळीतील या स्वातंत्र्य सैनिकाला अन्य गुन्हेगार कैद्यांच्या बरोबरीची श्रेणी देण्यात आली आणि त्या श्रेणी-तून राजकीय कैद्यांच्या श्रेणीत घेण्यासाठी देखील त्यांना तुरुंगात उपोषणादि हत्यारे उपसावी लागली. क्रांती काळात वसंतराव पाटलांनी ब्रिटिश सत्तेशी दिलेल्या झुंजीची साक्ष जखमेच्या व्रणाच्या रूपाने आजही त्यांच्या खांद्यावर कायम आहे. अखेर भारताला स्वातंत्र्य देण्याचे जाहीर करण्यात आले. त्यावेळी दि. २४–६–४६

रोजी त्यांची सुटका करण्यात आली. भारताच्या स्वातंत्र्यासाठी तळहातावर शीर घेऊन निर्भीडपणे लढणाऱ्या या थोर स्वातंत्र्य वीराने माफी मागण्यास स्पष्ट नकार देऊन तब्बल साडेतीन वर्षेपर्यंत दंडाबेडी सारखी भयंकर शिक्षा भोगली. दंडाबेडीची शिक्षा म्हणजे दोन्ही हातांत आणि पायांत चोवीस तास साखळदड बांधलेले. आणि झोपायचे असेल तरी पाठीने भींतीचा आधार घेत घेत आडवे व्हावे लागे. साडेतीन वर्षे या अवस्थेत दादांनी काढली.

त्यांची सुटका झाल्यावर कृष्णेच्या वाळवंटात त्यांचा सत्कार करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या समारंभासाठी जन-सागराला महापूर आला होता. संथ कृष्णामाईदेखील आनंदाने वेडी होऊन दुथडी भरून वाहात होती. सांगलीत निघालेल्या दादांच्या भव्य मिरवणुकीवर फुलांचा पाऊस पडला. अश्रूंचा शिडकाव झाला. प्रेमाचे, आनंदाचे व जिव्हाळ्याचे अश्रू. आपल्या लाडक्या नेत्याला लोकांनी डोळे भरून पाहिले. भगिनींनी त्यांना ओवाळले. वृद्ध मातांनी दृष्ट काढली. शाहीरांनी या शूरमर्दाचे पोवाडे गाईले. लाख-मुखाने दादांचा जयजयकार झाला. सारा आसमंत दणाणून गेला. कृष्णेचे वाळवंट धन्य झाले

आज विधायक कार्याकरिता स्वतःला वाहून घेतलेले शांत, धीरगंभीर, हळूवार मनाचे वसंतराव दादा पाटील हे ४२ साली इतके जाज्वल्य क्रांतिकारी भूमिगत चळवळीतील अग्रगण्य कार्यकर्ते होते हे फक्त आज दादांना ओळखणाऱ्या इसमांना सांगून खरे वाटणार नाही. याबद्दल बोलतांना दादा म्हणतात— ‘ त्यावेळी मी पंचविशीचा होतो. आज पन्नाशीचा आहे. ही गोष्ट महत्त्वाची आहे आणि त्या वेळच्या वातावरणाची आजच्या पिढीला विशेष कल्पनाही येणार नाही, असे सांगून दादा त्यावेळी राष्ट्रप्रेमाने भारावलेल्या परिस्थितीचे वर्णन करताना तल्लीन होऊन जातात त्यावेळी वातावरणच असे होते की, माझ्यासारखा तरुण राष्ट्रीय चळवळी-पासून अलिप्त राहूच शकत नव्हता. भूमिगत चळवळ ही त्यावेळी गरजेची गोष्ट होती असे दादा सांगतात. सत्याग्रहीचे आणि भूमिगत

चळवळ करणाऱ्यांचे मार्ग भिन्न होते. पण स्वातंत्र्याच्या एकाच ध्येयाने प्रेरित होऊन सर्वजण चळवळीत पडले होते, हे विसरता उपयोगी नाही भारताला स्वातंत्र्य कोणत्या चळवळीने मिळाले हे शोधून काढण्याचा निश्चित तराजू असूच शकत नाही. हा वाद ही चर्चाच वायफळ आहे. सत्याग्रहाच्या काय किंवा भूमिगत चळवळीच्या काय कोणत्याही मार्गाने देशाच्या स्वातंत्र्यासाठी ज्यांनी लढा दिला इतकेच नव्हे तर त्यापूर्वीसुद्धा १८५७ पासून किंबहुना ब्रिटिश राजवट भारतात आली तेव्हापासून ज्यांनी आपापल्या परीने प्रयत्न केले, त्या सर्वांच्या त्यागातून, परिश्रमातून आपल्याला स्वातंत्र्य मिळाले. आणि म्हणूनच हे स्वातंत्र्य अधिक मोल्यवान आहे असे दादा म्हणतात.

त्यांच्याच शब्दात सांगायचे तर प्रत्येकाचे जीवन आणि प्राण लाख मोलाचे आहेत. शेकडो नव्हे हजारो भारतीयांनी आपले जीवन, आपले प्राण ज्या स्वातंत्र्यासाठी अर्पण केले ते स्वातंत्र्य किती मोलाचे असले पाहिजे?

त्या स्वातंत्र्याचे रक्षण करणे आपले सर्वांचे पवित्र कर्तव्यच आहे.

बेचाळीसच्या क्रांतीतून सामील झाल्यामुळे ब्रिटिशांच्या कैदेत हालअपेष्टा भोगून वसंतराव पाटील मुक्त झाले. पण त्याहिपेक्षा एका कठीण दिव्यातून त्यांना त्यानंतर पार पडावे लागले. वसंतराव दादा पाटील सार्वजनिक जीवनातील पुढील मार्ग अद्यापि निश्चित करीत होते. तुरुंगातून ते बाहेर पडले. पिस्तुले, बंदुका. टाईम बॉम्ब असल्या स्फोटक गोष्टींना सरसावलेल्या दादांच्या हातांनी आता यापुढे वेगळेच काहीतरी करायचे ठरविले होते. कारण शस्त्रास्त्रांनी ज्या शत्रूशी लढायचे तो शत्रू निघून गेला होता. परंतु दारिद्र्य, अज्ञान, बेकारी अशा त्याहून भयकर शत्रूंशी आता देशाला लढायचे होते. दादांना त्याची पूर्ण जाणीव होती. स्वातंत्र्य चळवळीत ब्रिटिशां-विरुद्ध लढून आपले कार्य संपले अशा समाधानात ते कधीही स्वस्थ बसले नाहीत उलट आता आपल्या कार्याला आपण खरी सुरवात करावयाची आहे असेच त्यांना वाटत होते. पण ती सुरवातच कशी

करावयाची याची स्पष्ट दिशा अद्याप त्यांना ठरवावयाची होती. आयुष्यातील एक पर्व संपवून दुसऱ्या पर्वाच्या पायथ्याशी ते उभे होते.

याच सुमारास महात्मा गांधींचा खून झाला. सबंध देश शोक-सागरात बुडून गेला. सबंध देशात हाहाःकार उडाला आणि तशात परिस्थितीने वेगळे स्वरूप घेतले. काही माथेफिरू लोकांमुळे विशिष्ट जातीविरुद्ध भावना भडकविण्यात आल्या. त्यात सांगली जिल्हाही सापडला. खेड्यापाड्यातील कित्येक लोकांचे जमाव सांगलीच्या परिसरातील ब्राह्मणांची घरें जाळीत निघाले. सर्व जाती, जमातींच्या देशाच्या ऐक्यासाठी ज्यांनी जिवाचे रान केले त्या महात्म्याच्या निधनानंतर त्याच्याच खुनाचे निमित्त करून भडकविण्यात आलेल्या या जातीय, विषारी भावनांचा डोंब उमळलेला पाहून दादांच्या मनाला खूप यातना झाल्या. ते ताबडतोब बाहेर पडले. भडकलेल्या जातीय भावना शांत करण्यासाठी माथेफिरूंना आवरण्यासाठी समाजाचे रक्षण करण्यासाठी भडकलेल्या जमावाला आवरणे सोपे नव्हते. त्यांची समजूत घालून, सामोपचाराचा पवित्रा घेऊन, युक्तीप्रयुक्तीने त्यांना आवरण्याचे कठीण कार्य दादांनी केले. कुणाचेही घर जाळू नका, हवीतर घरावर विशिष्ट जातीच्या संघटनेच्या नावाची पाटी असल्यास ती जाळा असे सांगून लोकांना घरे जाळण्यापासून परावृत्त करण्याचा आणि त्याचबरोबर त्यांच्या भावना शांत करण्याचा प्रयत्न दादांनी कसोशीने केला. असाच एक वृद्ध जमाव जाळपोळीच्या उद्देशाने निघाला असता सांगलीच्या राजेसाहेबांच्या सांगण्यावरून दादा तात्काळ निघाले आणि ट्रकमधून त्यांनी अनावर झालेल्या जमावास घरी जाण्याचा युक्ती प्रयुक्तीने सल्ला दिला. परंतु काही हितसंबंधियांनी दादांच्या या थोर मानवतावादी कामगिरीचे कौतुक करण्याचे तर बाजूलाच राहो–पण दादांवरच जातीयवादाचे किटाळ उडविले. दादांनाच जातीयवादी ठरवून त्यांना बदनाम करण्याचा प्रयत्न केला.

जातीय संघटनेच्या नावाच्या पाट्या जाळा अशा अर्थाचा

दादांनी दिलेला सल्ला किंवा क्रुद्ध जमावाला आवरण्यासाठी दादांनी काही वेळा घेतलेला सामोपचाराचा पवित्रा यातून या लोकांना दादा जातीयवादी असल्याचा वास आला. पाट्या जाळण्याचा दादांनी जो सल्ला दिला तो घरे जाळण्यासाठी निघालेल्या क्रुद्ध जमावाच्या रागाला मार्ग करून देऊन त्यांच्यातील हवा काढून घेण्यासाठी. समारोपाचा पवित्रा दादांनी प्रसंगी घेतला तो देखील परिस्थिती ओळखून. अशा युक्त्या प्रयुक्त्या योजून जर दादा वागले नसते तर सबंध सांगली शहरात अनेकांच्या घरादारांची कदाचित् होळी पेटली असती. इतक्या कठीण प्रसंगी कसेही करून लोकांना शांत करणे हे महत्त्वाचे होते. नुसती भाषणे करून किंवा धाकदपटशा दाखवून जमावाने ऐकले नसते. वसंतराव दादांनी बेचाळीसच्या चळवळींत तळहातावर शिर घेऊन परकीय सत्तेशी लढा दिला. १९४६ च्या जाळपोळीच्या वेळी जिवाची पर्वा न करता जातीय ऐक्य टिकविण्यासाठी ते झटले. पण इतके करूनही त्यांच्यावरच जातीयवादाचा आरोप काही लोकांनी केला हा खरा दैवदुर्विलास. अर्थात् कालांतराने त्यांच्या नावावर उडविलेले शिंतोडे आपोआपच पुसले गेले. दादांची खरी ओळख, एकूण परिस्थितीची खरी जाणीव लोकांना होऊ लागली तसतसा दादांच्या कीर्तीला उजाळा मिळत गेला. दादांचे नेतृत्व या कसोटीतून तावून सुलाखून निघाले आणि ते बावनकशी असल्याचे सिद्ध झाले.

# ६ : काँग्रेसचे दादा

काँग्रेस पक्षाने देशभर सुरू केलेल्या स्वदेशी आणि बहिष्कार चळवळीची बीजे दादा शाळेत असतानाच त्यांच्या मनात पेरली गेली आणि विद्यार्थी जीवनात चहा सोडणे, खादी वापरणे अशी वैयक्तिक व्रते घेणारे दादा बाल वयातच काँग्रेसच्या कार्यक्रमाकडे वळले ह आधी सांगितलेच आहे. परंतु काहीही झाले तरी ते बालवय. अनेक विचारांचे अल्प वा दीर्घ काळ टिकणारे प्रभाव मनावर पडत असतात व त्यानुसार माणसाचे मत बदलत जाते. दादाही काही काळ राष्ट्रीय स्वयसेवक सघाचे स्वयसेवक होते. सत्यशोधक चळवळीकडेही ते वळले. पण १९२९ मध्ये सोलापूरच्या मल्लाप्पा धनशेट्टी आदि पांच हुतात्म्यांना फाशी दिले. त्यामुळे स्वातंत्र्य चळवळीस जोर आला. चळवळीच्या ज्वाळा देशभर भडकल्या. वयाच्या बाराव्या वर्षी दादांच्या हृदयाच्या एका कोपऱ्यात त्या ज्वालेची एक ठिणगी पडली आणि १९४२ मध्ये पंचविशीच्या धगधगीत जवानीत त्या ठिणगीचा भडका झाला. १९२९ मध्ये दादा विद्यार्थी होते. त्यामुळे प्रत्यक्ष कार्य दादांना करता आले नाही. पण १९३७ साली शिक्षण सुटले. आणि नंतर दादा काँग्रेसचे स्वयंसेवक झाले १९३८ मध्ये सांगलीला काँग्रेसची राष्ट्रीय परिषद भरली होती. या परिषदेस एम. एन्. रॉय आदि मंडळी आली होती. त्यांच्या व्याख्यानांचा, विचारांचा दादांच्या मनावर बराच प्रभाव पडला. दादांनी एव्हांना काँग्रेसच्या कार्याला पूर्णपणे वाहून घेतले होते दादांचे संघटना कौशल्य आणि प्रामाणिक कार्य यांची लोकांना प्रचीती यायला वेळ लागला नाही. आणि १९३८ मध्ये ते तासगाव तालुका काँग्रेस कमिटीचे सेक्रेटरी झाले. १९४० पर्यंत ते या पदावर होते. त्याच वर्षी मत्रीमंडळाने, कलेक्टर, मामलेदार यांनी राजीनामे द्यावेत या मागणी-

साठी सत्याग्रहाची चळवळ सुरू झाली. सर्वश्री स्वामी सदानंद भारती, धुळाप्पा अण्णा नवले, वि. स. पागे, दादासाहेब पागे, आत्माराम बापू पाटील ही मंडळी पहिले पाच सत्याग्रही म्हणून निवडले गेले. त्यांनी सत्याग्रह केला. त्यांना अटक करण्यात आली आणि सहा महिन्यांची शिक्षा झाली. ही सत्याग्रहाची चळवळ चालू असतानाच दादांच्या नेतृत्वाखाली एक मोठा मोर्चा मामलेदार कचेरी-वर गेला. दादा आणि इतर १५ माणसे मामलेदाराच्या कचेरीत घुसली. तिथे त्यांनी तिरंगी ध्वज लावला. वंदेमातरम गीत म्हटले आणि ...मामलेदाराला खादीची टोपी घातली. हे कार्यसुद्धा किती धाड-साचे आणि निधड्या छातीच्या माणसाचे होते याची आजच्या तरुणांना कल्पना यायची नाही. नुसता मोर्चा म्हटलं तरी लाठी-हल्ला, अश्रूधूर, गोळीबारापर्यंत मजल जाई. मग दादांनी तर थेट मामलेदारांच्या कचेरीपर्यंत मोर्चा नेला आणि मामलेदारालाच खादीची टोपी घातली. दादांनी अशा रीतीने दोन वर्षांत जनतेत लोकप्रियता आणि पोलीसांमध्ये दरारा निर्माण केला. कार्यकर्त्यां-पासून लहानशा नेतेपदापर्यंत त्यांनी मजल मारली. १९४० मध्यें पुण्याला मौलाना आझाद यांच्या अध्यक्षतेखाली अखिल भारतीय काँग्रेसचे अधिवेशन झाले. वैयक्तीक सत्याग्रह संपला आणि सामुदायिक चळवळीला जोर आला. याच काळात दादांनी तालुक्यातील व जिल्ह्यातील जनता संपर्क वाढविला. अनेक लोकांना ते भेटायचे. स्वातंत्र्य चळवळीचे, काँग्रेसचे महत्त्व समजावून सांगायचे. खादी, परदेशी मालावर बहिष्कार आदि तत्त्वांचा प्रसार करायचे. संघटने-कडे माणसे जोडायचे. शांतपणे चाललेले हे दादांचे कार्य म्हणजे भावी कार्याची भक्कम बैठक होती. प्रत्यक्ष चळवळीच्या या काळात विशेष नाव घेण्यासारखा भाग नसला तरी जास्तीत जास्त लोकांना काँग्रेसकडे ओढण्याचे, जनजागृतीचे, लोकांमध्ये स्वतःबद्दलचा विश्वास निर्माण करण्याचे महत्त्वाचे कार्य दादांनी या काळात पार पाडले.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ही झुंज संपली. स्वतंत्र भारताची गरज बदलली. दादांनी सहकारी चळवळ आणि विधायक कार्याला वाहून

घेतले. १९४६ मध्ये ते सातारा जिल्हा काँग्रेस कमिटीचे सेक्रेटरी झाले. १९५० मध्यें जिल्हा होमगार्ड कमांडंट म्हणून त्यांची नेमणूक झाली. भूमिगत चळवळीच्या काळात काही गुंडांनीही आपले हात धुऊन घेण्याचा प्रयत्न केला. स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही त्यांचा त्रास चालूच होता. १९४९ मध्ये सातारा जिल्ह्याचे होमगार्ड कमांडंट म्हणून दादांची नेमणूक झाली. सातवीपर्यंत शिकलेला हा, ही महत्त्वाची जागा कशी काय सांभाळील अशी अनेकांना शंका वाटत होती. दादांनी प्रथम जिल्ह्यात वाढलेल्या गुंडगिरीचा बंदोबस्त करण्याचे ठरविले. त्यावेळी सातारा व सांगलीचा एकच जिल्हा होता. या जिल्ह्यात सखाराम बारटेच्या टोळीचा उपद्रव फार वाढला होता. दादांनी या बारटेच्या टोळीच्या बंदोबस्तासाठी मोहीम उघडली आणि स्वतः बारटेला ठार मारून त्याची बंडाळी मोडून काढली व जिल्ह्यातील लोकांना निर्धास्त केले.

सध्याचे महाराष्ट्र विधान परिषदेचे अध्यक्ष श्री. वि. स. पागे यांनी त्या काळात दादांना एक पत्र पाठविले होते. ते या पत्रात म्हणतात, आपल्याकडे एखादे काम सोपविण्यात येते तेव्हा काम मोठे आणि त्या मानाने आपण फार लहान आहांत असे वाटते. पण नंतर काही दिवसातच आपण खरोखर फार मोठे असून ते काम तुमच्या मानाने फार लहान आहे अशी प्रचीति येते !

१९५२ च्या निवडणुकीत दादा काँग्रेसच्या तिकिटावर विधान सभेवर निवडून गेले. काँग्रेस संघटनेत राहून विधायक कार्यावर भर देण्याचे आणि लोकसंग्रहाचे महत्त्वाचे कार्य तेव्हापासून दादा करीत आहेत. त्यांच्या कर्तत्वाची छाप संघटनेवर अधिकाधिक पडत गेली. दादा १९६२ मध्ये महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सेक्रेटरी झाले. आणि १९६४ मध्ये महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या उपाध्यक्षपदाची धुरा त्यांच्या खांद्यावर आली. आणि आज एका अग्रेसर राज्यातील कमिटीच्या सर्वोच्च स्थानावर अध्यक्ष पदावर त्यांची नियुक्ती झाली.

सबंध देशांत सत्तेसाठी धावपळ, अधिकारांच्या पदांसाठी रस्सी खेच, मारामाऱ्या चालू आहेत. अशा वेळी गेल्या सार्वत्रिक निवडणु-

कीत. ते साध्या आमदार पदासाठीही उभे राहिले नाहीत. संघटनेतून आमदार पद आमदार पदातून मंत्रीपद मिळवण्याची यत्किंचितही धडपड त्यांनी केली नाहीं. त्याग आणि निःस्वार्थी सेवेचा महान आदर्श त्यांनी सर्व कार्यकर्त्यांपुढे ठेवला आहे. सत्तेसाठी चाललेल्या हमरीतुमरीच्या आजच्या गढूळ राजकारणात दादांसारख्या कर्मयोग्यापुढें कुणीही नतमस्तक झाल्याशिवाय राहणार नाही. अधिकारपदाची लालसा जशी त्यांना नाही तसा अधिकारपदाबरोबर येणारा, औपचारिकपणा, कृत्रिमपणा, या गोष्टीही त्यांच्या स्वभावात नाहीत. साधेपणा, निस्वार्थीसेवा, या गुणांचा आदर्श राष्ट्रपिते महात्मा गांधींनी देशापुढे ठेवला. आज ते गुण अंगी बाणविलेला कार्यकर्ता शोधून सापडणे दुर्मिळ झाले. ज्या काँग्रेसच्या मागे देशातील कोट्यावधी लोक आपुलकीने उभे राहिले; ज्या काँग्रेस कार्यकर्त्यांकडे त्यांनी आदराने पाहिले. त्या संघटनेतील लोक देशाच्या अनेक भागांत आज जनतेला खुजे, वाटू लागले असले तरी महाराष्ट्रात काँग्रेसचे अध्यक्ष दादा दीपस्तंभासारखे उभे राहून सर्वांना प्रकाश दाखवीत आहेत.

गेल्या सार्वत्रिक निवडणुकीत देशात अनेक ठिकाणी काँग्रेस पक्षाला भयंकर हादरे बसले. काँग्रेसचा दीपस्तंभ या वादळात पाय रोखून उभा राहिला. महाभारत युद्धात कृष्णाने प्रत्यक्ष लढाईत शस्त्र हाती न धरता फक्त सारथ्य केले. निवडणुकीच्या महाभारतात दादांनीही स्वतः कुठेही उभे न राहता काँग्रेसच्या रथाचे सारथ्य केले आणि घवघवीत यश मिळवून दिले. गेल्या कित्येक वर्षांची दादांची तपश्चर्या या यशास कारणीभूत झाली. दादांनी सत्ता मिळवली नाही. पैसा मिळवला नाही. पण माणसे मिळविली. दादांसारखा कुशल लोकसंग्राहक आणि संघटक आज भारतात नसेल असे म्हटले तर त्यात अतिशयोक्ति होणार नाही. महाराष्ट्राचे थोर नेते गृहमंत्री श्री. यशवंतरावजी चव्हाण एकदा म्हणाले, मी आज जो थोडा बहुत मोठा झालो आहे असे दिसते ते मोठेपण माझे नाही. ज्या लोकांच्या बरोबर मी वाढलो, वावरलो त्यांचा हा खरा मोठेपणा.

दादांसारख्या थोर नेत्याचे सान्निध्य मला मिळाले हे मी माझे भाग्य समजतो. त्यांच्या सावलीत मी वाढलो. त्यांच्या जीवनापासून मी स्फूर्ती घेतली आहे. आजही घेत आहे. महाराष्ट्र काँग्रेसला गेल्या निवडणुकीत भरघोस यश मिळाले पण देशात त्यांचा ठिकठिकाणी पराभव झाला याबद्दल दादांचे मत विचारले. अपयशाचे खापर कोणाच्या तरी माथ्यावर न मारता किंवा काहीही निमित्त पुढे न करता ते म्हणाले, लोकांचा अपेक्षाभंग झाल्यामुळे त्यांना काँग्रेसचा कंटाळा आला होता. काँग्रेसमध्ये एकसंधीपणा ऐवजी व्यक्तीचे महत्त्व वाढले. देशात धान्यप्रश्न, महागाई, बेकारी, लाचलुचपत, असे प्रश्न निर्माण झाले आहेत. या सर्व गोष्टींना कोणत्या गोष्टी कारणीभूत आहेत किंवा कोण जबाबदार आहेत हा प्रश्न वेगळा. पण अशा परिस्थितीत लोकांना बदल हवासा वाटला.

काँग्रेसला पुनः प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठी काय करावे याबद्दल बोलताना ते म्हणाले, काँग्रेस पूर्वीपेक्षा अप्रिय झाली आहे हे आधी निःसंकोचपणे मान्य केले पाहिजे. तरच पुढे सुधारणा होऊ शकेल. देशापुढे अनेक समस्या आहेत. लोकही त्या समजू शकतात. पण त्या सोडविण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न झाले नाहीत तर लोक स्वाभाविकपणे चिडतात. समस्या सोडविण्यात यश येवो न येवो त्या सोडविण्याचे प्रयत्न प्रामाणिकपणे झाले पाहिजेत. काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी व मंत्र्यांनी जनतेबरोबरचा संपर्क सातत्याने ठेवला पाहिजे आणि कायदे केल्यानंतर त्यांची अंमलबजावणी लोककल्याणासाठी झाली पाहिजे. सत्ता हे लोकांचे प्रश्न सोडविण्याचे साधन बनविले पाहिजे. असे झाले तर लोक पूर्वीपेक्षाही अधिक मतांनी काँग्रेसला निवडून देतील.



**सहकार क्षेत्रांतील तीन तपस्वी :** सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ व नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष श्री. धनंजयराव गाडगीळ, श्री. वसंतरावदादा पाटील आणि श्री. वा. चु. श्रीश्रीमाळ.



सांगलीच्या सहकारी साखर कारखान्याच्या आवारांतील संकरित बियाणें—प्रक्रिया केंद्रास महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक यांनीं भेट दिली. त्यावेळीं श्री. नाईक व अन्य प्रतिष्ठितांसमवेत दादा.

कशातच रस नव्हता. शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या हाडाच्या आणि मनाच्या या शेतकरी पाटलाने शेतकऱ्यांच्या हितसंवर्धनाकडे लक्ष द्यायचे ठरविले. बेचाळीसच्या क्रांतीत सामील झालेल्या क्रांतीकारी वसंतराव दादांचा शेतकरी आणि सहकारी चळवळीकडे लक्ष देण्याचा निर्णय हा पूर्वीपेक्षाही अधिक क्रांतीकारक म्हणावा लागेल. बेचाळीसच्या राजकीय जीवनात पडलेले पुष्कळसे लोक सत्तेच्या लालसेने शासकीय कार्याकडे धावले. काही निवृत्तच झाले. दादांनी स्वार्थी किंवा आततायी असा कोणताच निर्णय न घेता खऱ्या कर्मवीराप्रमाणे विधायक चळवळीस वाहून घेण्याचा निर्णय घेतला. सामाजिक क्षेत्रातही समाजसुधारणेच्या चळवळीची अनेक अंगे उपांगे आहेत. त्यात नेमक्या सहकारी चळवळीची कास धरणाऱ्या दादांच्या दृष्टीची खरी किंमत आज सर्वांना कळू लागली आहे.

असा निःस्वार्थी सेवेचा व दूरदृष्टीचा हा निर्णय दादांच्या स्वतःच्या, शेतकऱ्यांच्या आणि महाराष्ट्राच्या जीवनात क्रांती घडवून आणणारा ठरला आहे. मराठी सातवीपर्यंत शिकलेल्या या अल्पशिक्षित परंतु अत्यंत बुद्धिमान्, निष्ठावान् आणि कळकळीच्या कार्यकर्त्याने १९४८ मध्ये सांगलीच्या ॲग्रिकल्चर प्रोडयूस मार्केट कमिटीच्या अध्यक्षपदावरून सांगली बाजारपेठेतील कृषिमालाच्या व्यापारात लक्ष घातले आणि अल्पावधीतच या व्यापारातील बारीक सारीक खाचाखोचा जाणून घेतल्या. या व्यापारात आजपर्यंत शेतकऱ्यांची होणारी फसवणूक आणि नुकसान त्यांच्या लक्षात आले. या व्यापारात शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करण्याच्या प्रयत्नातूनच सहकारी उपक्रमाचे महत्त्व दादांना उमगले आणि सहकारी प्रयत्नांनीच शेतकऱ्यांचे, सामान्य जनांचे प्रश्न सोडविण्याचा महायज्ञ त्यांनी सुरू केला. एकीकडे सांगली जिल्ह्यात काँग्रेसचे नेतृत्व सांभाळतानाच दुसरीकडे सहकारी चळवळीकडे त्यांनी लक्ष दिले. राजकारणापेक्षादेखील अधिक हिरिरीने आणि कळकळीने त्यांनी सहकारी चळवळीकडे लक्ष दिले असे म्हटले तरी चालेल. दादांच्या सहकारी प्रयत्नांमुळे जिल्ह्यातील काँग्रेस संघटनादेखील सत्ताभिमुख न बनता ती जनताभिमुख बनवून

तिला गांधीजींच्या कल्पनेतील विधायक कार्याची बैठक मिळाली हा दादांमुळे जिल्हा काँग्रेसला झालेला फार मोठा फायदा होय. काँग्रेस संघटना, बेचाळीसच्या स्वातंत्र्य चळवळीतील कार्य यामुळे मुळातच शेतकरी कुटुंबातील दादांना शेतकऱ्यांचा अधिक निकटचा परिचय झाला होता. शेतकऱ्यांना सहकाराच्या चळवळीखाली आणतानाच हळूहळू शेतकऱ्यांना नवा आधुनिक दृष्टिकोणही दादांनी दिला. शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारण्यासाठी त्याला जिराईत शेतीशिवाय बागाईत शेतीची त्यांनी आवड लावली.

सांगली जिल्ह्यात सुमारे दीड कोटी रुपयांच्या ६१ लिफ्ट इरिगेशन योजना त्यांनी सुरू केल्या आहेत. २५ हजार एकरांवर जिराईत जमीन बागाईत केली आहे. जिल्ह्यात उसाची लागवड मोठ्या प्रमाणावर त्यांनी करविली. त्यातूनच पुढे सहकारी कारखानदारी जन्मास आली. सांगलीच्या उत्तरेस माधवनगर रोडवर माळरान जमीन होती. त्या ठिकाणी श्री. यशवंतराव चव्हाण यांचे हस्ते कारखान्याचे भूमिपूजन झाले. साखर कारखाना उभारण्यासाठी माणसे मुंग्यासारखी कामे करू लागली. १००० टन गाळप शक्ती असलेल्या शेतकरी सहकारी साखर कारखान्याची गाळपशक्ती आज २६०० टन झाली आहे व ती वाढवून ५००० टनांपर्यंत नेण्यासाठी पावले टाकण्यात आली आहेत.

साखर कारखान्यातून बॅगॅस नावाचा पदार्थ निघतो. त्यापासून न्यूजप्रिंट कागद बनविण्याचा कारखाना उभारण्याची २७ कोटी रुपयांची योजना देखील तयार आहे. या संकल्पित कारखान्यातून रोज ३०० टन कागद तयार होणार असून सहकारी तत्त्वावर चालणारा हा भारतातील पहिला कागद कारखाना असेल.

याशिवाय मळीपासून सहकारी तत्वावर स्पिरिट बनविण्यात येत असून दररोज ३००० गॅलन स्पिरिट तयार होत आहे. ३$\frac{१}{२}$ टक्क्याची दारू तयार करण्याचा परवाना मिळाला असून लवकरच हा कारखाना सांगलीला सुरू होत आहे.

ज्या खेड्यांना शेतीसाठी पुरेसे पाणी उपलब्ध नव्हते त्यांना सह-

कारी पद्धतीच्या पाटबंधारे योजना हाती घ्यायला लावून शेतीला पाणी दिले. शेतीचे संपूर्ण ज्ञान आणि आधुनिक दृष्टिकोण असलेल्या दादांनी बागाईत शेती शक्य नव्हती तिथे भुईमूग लावण्यास शेतकऱ्यांना उत्तेजन दिले. सहकारी उत्पादनाबरोबर सहकारी प्रक्रिया केंद्राचे उद्दिष्टही दादांनी डोळ्यासमोर ठेवलेच होते. त्यामुळे भुईमूगाच्या उत्पादनानंतर सहकारी तेल केन्द्रे निर्माण झाली. बागाईत आणि पैसा देणाऱ्या पिकांची लागवड करतांना धान्योत्पादनाकडे देखील त्यांनी दुर्लक्ष होऊ दिले नाही. धान्याच्या जिराईत शेतीत संकरित बियाण्यांची सहकारी योजना दादांनी सुरू करून दिली. जिराईत शेती करणारे तसेच अन्य लहान शेतकऱ्यांना वर्षातून बाराही महिने काम नसते. थोड्या भांडवलात फावल्या वेळात होऊ शकेल असा कामधंदा त्यांना पुरविण्याची कल्पना दादांनी प्रत्यक्षांत आणली. कुक्कुटपालनाचा व्यवसाय लोकप्रिय केला आणि जिल्ह्यात जागोजागी सहकारी पद्धतीवर कुक्कुटपालन केन्द्रे स्थापन केली. सहकारी प्रयत्नांनी सुरू केलेली ही सर्व कामे सतत टिकून राहण्यासाठी त्यांना द्रव्यबळाचाही थोडाफार पाठिंबा असणे आवश्यक होते. या सर्व सहकारी उपक्रमांना अर्थबळ पुरविण्यासाठी त्यांनी सहकारी बँका स्थापन केल्या. आपल्या देशात, राज्यात किंवा जिल्ह्यात सगळीकडे शेतीवर बहुसंख्य लोक अवलंबून असून शेती हाच अर्थव्यवस्थेचा पाया आहे. म्हणून दादांनी कृषि क्षेत्रात सहकारी प्रयत्नांनी विकास साधण्यावर भर दिला. पण त्याच बरोबर आधुनिक युगातील उद्योगधंद्याचे महत्त्वही त्यांच्या दृष्टीतून सुटले नाही. मोठे मोठे योजनाकार, अर्थतज्ञ, विद्वान लोक कृषि औद्योगिक क्रांतीच्या बोजड भाषेंत आज बोलू लागले आहेत. वसंत दादांसारखा साधासुधा पण अत्यंत धोरणी शेतकरी माणूस वीस वर्षापूर्वी हेच सांगत होता पण साध्या, सोप्या, खेडवळ भाषेत. शेती वाढली पाहिजे आणि धंदादेखील वाढला पाहिजे. दोघे एकमेकांवर अवलंबून आहेत. त्यासाठी आपण सर्वांनी मिळून प्रयत्न करू या. असा मंत्र दादांनी दिला. नुसता मंत्र नव्हे तर त्याचे तंत्रही दिले. आदेश

आचरणात आणला. प्रत्यक्ष कामाचा डोंगर उभा केला. सांगली जिल्हा सहकारी प्रयोगशाळा बनली.

या प्रयोगशाळेत सहकारद्वारे शेतीचा कायापालट घडविण्याचे प्रयोग सुरू असतानाच उद्योगधंद्याच्या क्षेत्रांतही दादांनी सहकाराचा श्रीगणेशा केला. पाहता पाहता सिमेंट पाईप तयार करण्याचा सहकारी कारखाना, सहकारी स्पिनिंग मिल, छोट्या उद्योगधंद्यासाठी एक सहकारी औद्योगिक वसाहत जिल्ह्यात स्थापन झाली. शेती व्यतिरिक्तच्या क्षेत्रातील कित्येक बेकारांना रोजगार मिळाला. जिल्ह्यातील शेतीच्या कायापालट आणि जिल्ह्याचे औद्योगिकरण यामुळे १९४८ पासून तो परवापर्यंतच्या दीड तपात सांगली जिल्ह्यातील खेड्यापाड्याचा देखील चेहरा मोहरा एकदम बदलून गेला आहे. सहकारी संस्थांचे जाळेच सबंध जिल्ह्यात पसरले आहे. खेडोपाडी नव्या उत्साहाने आणि कार्यामुळे जीवनाला वेगळी गती मिळाली आहे. शेतकी आणि अन्य सामान्य माणसे देखील उद्योगी बनली आहेत. आधुनिक युगाचे वारे झोपड्यांपर्यंत पोहोचले आहे. सहकारी संस्थांच्या वाढत्या संसाराबरोबर ग्रामीण लोकांमध्ये शिक्षणाची आवडही निर्माण झाल्यामुळे सहकारी उपक्रमांचे बोट धरून नव्या नव्या शिक्षण संस्था निर्माण झाल्या आहेत. शेतकऱ्यांची मुले शिकून सज्ञान होत आहेत. शेतकरी रासायनिक खते आणि कारखानदारीची भाषा बोलू लागला आहे. पागोटे घातलेली ग्रामीण मंडळी बँका आणि चेकचा व्यवहार करू लागली आहेत. आपल्या सामर्थ्याची नवी ओळख जणू त्यांना झाली आहे.

या सर्व लहान मोठ्या सहकारी उपक्रमांमध्ये वसंतराव दादा पाटीलांचे नाव अभावानेच आढळेल. वास्तविक या प्रत्येक उपक्रमाचे प्रवर्तक दादाच आहेत. परंतु दादांच्या कार्याचे हेच वैशिष्ट्य आहे. मुलाला स्वावलंबी बनविण्यासाठी झटणाऱ्या वडिलांसारखी दादांची भूमिका असते. मुलाला स्वतःच्या पायावर उभे राहायला शिकवावे आणि नंतर त्याचा स्वतंत्र संसार मांडून देऊन आपण दूर राहून त्याची काळजी वाहावी तसे दादांनी सहकाराचा प्रत्येक उपक्रम

स्वावलंबी बनविला आहे. ज्या ज्या ठिकाणी ज्या ज्या क्षेत्रांत दादांनी सहकारी उपक्रम सुरू केला त्या प्रत्येक ठिकाणी प्रथम त्यांनी लोकांना बोट धरून सहकारी क्षेत्राखाली आणले. नव्या उपक्रमाची महती पटवून देऊन त्याविषयी त्यांना गोडी लावली आणि त्यांच्यातूनच तो उपक्रम पुढे चालविणारे नेते निवडून त्यांच्यावर जबाबदारी सोपविली. सांगली जिल्ह्यात सहकारी कार्यकर्त्यांचे असे जाळेच दादांनी निर्माण केले असून तोच जिल्ह्यातील सहकारी चळवळीच्या यशाचा पाया ठरला.

अशा रीतीने स्वतः प्रसिद्धी पराङ्मुख राहून गाजावाजा न करता सहकाराचे कार्य व रचना दादा निष्ठेने पार पाडीत आहेत. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना कारखानदार बनविण्याची महान कामगिरी ते पार पाडीत आहेत. सबंध महाराष्ट्रातील सहकारी चळवळींमागील प्रेरणा आणि शक्ती म्हणजे वसंतराव दादा पाटील. महाराष्ट्रातील सहकारी कारखान्यांनी तर सहकार क्षेत्रात एक ज्वलंत आदर्श निर्माण केला आहे आणि त्या मागोमाग दादांच्या नेतृत्वाखाली सहकारी चळवळीची वाटचाल पुढे होत आहे. १९५८ नंतर अनेक ठिकाणी भुईमूगाच्या शेंगांपासून तेल काढणारे सहकारी कारखाने निर्माण झाले. कापूस क्षेत्रात सहकारी जिनिंग, प्रेसिंग, फॅक्टऱ्या उभ्या झाल्या आहेत. तसेच सहकारी स्पिनिंग मिल्स देखील सुरू झाल्या आहेत. नांगर, पंप, खते, वगैरे शेतीसाठी आवश्यक मालाचे उत्पादनही सहकारी क्षेत्रात सुरू झाले आहे. शेतीच्या धंद्यासाठी लागणारी सर्व सामुग्री सहकारी क्षेत्रात निर्माण व्हावी असे दादांचे प्रयत्न सुरू आहेत. साखर कारखान्याच्या जोडीलाच आता सहकारी कागद कारखाना आला आहे. तसेच साखरेच्या धंद्यातच मध बनविण्याचा सहकारी कारखाना काढण्याचीही योजना आहे. हळूहळू इंजिनिअरिंग, विजेच्या उपकरणाचा धंदा या क्षेत्रांतही सहकाराचे लोण पोहोचविण्याची दादांची महत्त्वाकांक्षा आहे. सहकार क्षेत्रांत महाराष्ट्र आज भारतात अग्रेसर आहे. हे जरी खरे तरी आपण समाधानी राहून चालावयाचे नाही असा इशाराही

दादांनी दिला आहे. महाराष्ट्रातील सहकारी उद्योगधंद्याबद्दलच्या आजच्या स्थितीसंबंधी दादा म्हणतात सहकारी क्षेत्रातील सगळेच उद्योगधंदे यशस्वी झाले आहेत असे म्हणता येणार नाही. सहकारी क्षेत्रातील उद्योगधंद्यांना खाजगी धंदेवाल्यांशी अगदी निकराचा सामना करावा लागतो. उद्योग क्षेत्रात आज खाजगी धंदेवाल्यांची ताकद फार मोठी आहे. त्याच्याशी स्पर्धा करणे अवघड होऊन बसते. या क्षेत्रातील आजची समाजव्यवस्था सहकाराचे दृष्टीने मारक आहे. काही धंद्यांत खाजगी उद्योगधंदेवाल्यांची मक्तेदारी आहे. त्यात ते इतरांना पाय ठेवू देत नाहीत. माल साठवून किंमत वाढविण्याचे तंत्र उखडले गेले पाहिजे. सहकारी पद्धतीने उद्योगधंदे करणाऱ्यांना सरकारने मदत देऊन पुढे आणले पाहिजे. सहकारातून लोकशाही समाजवाद आणायचा तर आज देशाच्या अर्थ व्यवस्थेत उद्योगधंद्यांत जे दलाल अथवा एजन्सीज आहेत त्या त्वरीत नष्ट व्हायला हव्यात. उत्पादकाकडून आलेला माल गिऱ्हाईकाकडे सरळ पद्धतीने गेला पाहिजे. उत्पादकाला अधिकाधिक फायदा आणि गिऱ्हाईकांना किफायतशीर दराने मालाचा पुरवठा असे दुहेरी ध्येय साध्य करण्याच्या दृष्टीने दादांनी सहकारी उपक्रमांची योजना महाराष्ट्रात केली आहे. जनहितासाठी सहकारी चळवळ राबविताना खेड्यांच्या तांबडमातीत वाढलेल्या दादांनी समाज व्यवस्थेत किंवा विचारधारेत मुलभूत भारतीय बैठक कायम ठेवली आहे. रशियाची सहकारासंबंधीची पद्धती अथवा अमेरिकेतील शेतीसंबंधीच्या भांडवलप्रधान पद्धतीचा स्वीकार न करता त्या दोन्हीमधील चांगल्या गुणांचा स्वीकार करून त्यांनी सहकारी क्षेत्रात नव्या सहकारी पद्धतींचा अवलंब केला आहे. तसेच सामुदायिक सहकारी शेतीचे फायदेही त्यांत अंतर्भूत आहेत. सामुदायिक अथवा सहकारी शेतींत व्यक्ती आपले स्वतःचे शेत स्वतः करू शकते. परंतु त्याला लागणारी सर्व सामुग्री मात्र सहकारी पद्धतीने मिळू शकते. यामुळे सहाजिकच शेती उत्पादनाची वाढ होते आणि शेतीचाही विकास होतो. सहकारी शेतीत व्यक्तीची

प्रेरणा व सामुदायिकीकरणाचे फायदे यांच्यां मीलनाने उत्पादन वाढ होते. लोकशाहीची आपली बैठक यामुळे कायमच राहाणार आहे असे नव्हे तर ती अधिक दृढ होणार आहे.

गिऱ्हाईकांना वाजवी भावाने मालाचा पुरवठा करण्याच्या संदर्भात दादांनी महाराष्ट्र शासनाच्या एकाधिकार धान्य खरेदी योजनेची प्रशंसा केली आहे. त्यांच्या मते या पद्धतीमुळे साठेबाजी आणि किंमती वाढविण्याच्या अनिष्ट प्रवृत्तींना आळा बसत चालला आहे. अन्य शेतमालाबाबतही एकाधिकार खरेदीची पद्धत स्वीकारली तर लोकांना स्वस्त भावात पुरवठा होऊ शकेल असे दादांचे मत असून त्या दृष्टीने ते प्रयत्नही करीत आहेत.

सांगली जिल्ह्यात दादांनी सहकारी चळवळीचा जो भक्कम पाया तयार केला आहे त्याच पायावर उद्या महाराष्ट्राच्या प्रगतीचे कृषि औद्योगिक विकासाचे मंदीर उभे राहणार आहे. दादांचे क्षेत्र आज सांगली जिल्ह्यापुरतेच मर्यादित राहिले नसून अखिल महाराष्ट्राच्या विधायक युगाचे, सहकारी चळवळीचे ते अध्वर्यू बनले आहेत. दादांच्या ज्या प्रयत्नांनी सांगली जिल्ह्यात क्रांती घडवून आणली त्याच प्रयत्नांनी सबंध महाराष्ट्रात क्रांती घडून येईल या आशेने, श्रद्धेने आज महाराष्ट्र दादांच्याकडे पाहात आहे. दादांनी न बोलता आपले कार्य सबंध महाराष्ट्रात हळूहळू फैलावले आहे. महाराष्ट्राच्या राजधानीत बसून दादा सहकारी चळवळीची सूत्रे सांभाळीत आहेत. फोर्ट मधल्या आपल्या कचेरीत गादीच्या खुर्चीत किंचित विसावल्या-सारखे बसून एकाग्रचित्ताने आपल्या कार्यात दादा गढून गेलेले दिसतात. पंचविशीतील वसंत पाटलांच्या मानाने आज पन्नाशीतील दादा जरी विसावल्यासारखे दिसत असले तरी त्यांच्या मागील कार्याचा व्याप कितीतरी पटीने वाढला आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघाचे संचालक, महाराष्ट्रातील सहकारी विमा संघाचे अध्यक्ष, सहकारी फर्टिलायझर आणि केमिकल्स कारखान्याचे अध्यक्ष, राज्य सहकारी बँकेचे अध्यक्ष, राज्य सहकारी मार्केटिंग सोसायटीचे डायरेक्टर, राज्यातील फार्मिंग कॉर्पोरेशनचे डायरेक्टर,

ॲग्रो-इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनचे डायरेक्टर, कच्च्या माला संबधीच्या सल्लागार समितीचे अध्यक्ष, उसाच्या प्रादेशिक समितीचे अध्यक्ष, नियोजित सहकारी कागद कारखान्याचे प्रवर्तक, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष पद्मभूषण श्री. वसंतराव दादा पाटील

पूर्वीच्या राजे महाराजांनी देखील हेवा करावा अशी ही आजच्या लोकशाहीतील लोकनेत्याची किताबत आहे. नुकतीच महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे अध्यक्ष म्हणून दादांची नेमणूक झाली आहे. ही महत्त्वाची जबाबदारी स्वीकारली त्याच क्षणी दादांनी सहकारी बँकेचे अध्यक्षपद, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसचे अध्यक्षपद आणि शेतकरी सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्षपद या जबाबदाऱ्यांखेरीज बाकीच्या सर्व पदांचा राजीनामा देऊन टाकला. जी कामें हाती घ्यायची ती आपले समाधान होईल इतक्या मेहनतीने पार पाडायची असा दादांचा कटाक्ष आहे. म्हणूनच बाकीच्या डझनावारी सस्थांचे अध्यक्षपद विनाकारण अडकवून न ठेवता त्या पदांचा त्यांनी राजीनामा दिला.

महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे अध्यक्षपद दादांच्या आधी श्री. धनंजयराव गाडगीळांकडे होते. या पदाचा स्वीकार करताना दादा म्हणाले, 'श्री. धनंजयराव हे अत्यंत महान् पुरुष. त्यांचे कार्य पुढे चालविण्याचा मी यथाशक्ती प्रयत्न करीन. आपल्या सर्वांच्या सहकार्याने मी ही जबाबदारी अंगावर घेत आहे. माझी या अध्यक्षपदावर झालेली नेमणूक वैयक्तिक नसून आपण सामुदायिक नेतृत्वाने कार्य करावयाचे आहे. चांगल्या सहकारी संस्थांचे काम भांडवलाअभावी अडून राहू नये यासाठी त्यांना अधिकाधिक भांडवल पुरवठा करणे व अशा रीतीने सामान्य माणसापर्यंत हा भांडवल प्रवाह पोहोंचविण्याचे महत्त्वाचे कार्य आपणास करावयाचे आहे.'

'असे दहा वसंतराव दादा मिळाले तर महाराष्ट्राचे नंदनवन होईल.' असे श्री. यशवंतराव चव्हाण एकदा म्हणाले. दादांच्या कार्याचा श्री. यशवंतरावांनी केलेला हा गौरव किती सार्थ आहे हे आज दिसून येत आहे.

पन्नास माणसांच्याही कदाचित् आवाक्याबाहेरचे काम. पण दादा दोन हातांनी शांतपणे व हसतमुखाने यशस्वीपणे पार पाडीत आहेत. दादांकडे केव्हांही जा. कुणाशी तरी ते चर्चा–विचारणा करताना, कधी कुणाची गाऱ्हाणी ऐकताना, कधी मार्गदर्शन करताना तर कधी एखाद्या व्यापाऱ्याशी लाखाच्या व्यवहाराच्या वाटाघाटी करताना, कधी फोनवरून सहकारी चळवळीविषयी कुणाला सल्ला देताना, कधी एखाद्या महत्त्वपूर्ण शिष्टमंडळीशी वाटाघाटी करताना, तर कधी एखाद्या खेड्यातील शेतकऱ्याच्या खांद्यावर हात टाकून त्याच्या पिकपाण्याची चौकशी करताना दिसतात.

सामाजिक क्षेत्रात इतक्या उच्च पदाला पोहोचलेले दादा सहकारी उपक्रमामधील यशाचे श्रेय अत्यंत नम्रपणे या चळवळीतील लहान मोठ्या कार्यकर्त्यांना देतात. ते म्हणतात त्यांच्याच प्रयत्नावर आणि प्रामाणिकपणावर हा सारा पसारा उभा आहे.

दादांच्या मते सहकारी चळवळीतील हे कार्यकर्ते हाच आजच्या पर्यंतच्या सिद्धीचा आणि उद्याच्या यशाचा आधारस्तंभ आहे. सहकारी कार्यकर्त्यांच्या एका मेळाव्यात त्यांनी केलेले मार्गदर्शन याबाबतीत फारच महत्त्वाचे आहे. ते म्हणाले सहकारी चळवळ ही आजच्या युगाचा धर्म, आपल्या जीवनाची पद्धती ठरत आहे. अशा प्रसंगी सहकारी कार्यकर्ते सहकारी चळवळीत ज्या ज्या क्षेत्रात असतील तेथे राहून निष्ठापूर्वक त्यागी वृत्तीने त्यांनी काम केले पाहिजे. या चळवळीतील आपण अगदी सामान्य कार्यकर्ते आहोत अशी न्युनतेची भावना त्यांनी बाळगू नये. हेच कार्यकर्ते उद्याच्या या महान् जीवननिष्ठेचे पाईक आहेत याची जाणीव ठेवून त्या भावनेने त्यांनी काम करावे. कार्यकर्त्यांची सचोटी, प्रामाणिकपणा आणि निष्ठा हेच कोणत्याही सहकारी संस्थेचे खरे भांडवल आहे. अशा कार्यकर्त्यांचा संच असल्यास सहकारी संस्थेच्या यशाबद्दल शंका बाळगण्याचे कारणच नाही. हे भांडवल आज कोणी पुरवू शकणार नाही. ते मुळातच असले पाहिजे. पैशाचे भांडवल सरकार किंवा बँकांसारख्या संस्था पुरवू शकतील, प्रामागिकपणा, निष्ठा या

गोष्टी बाजारात मिळत नाहीत. अर्थात पैशाचे भांडवल मदत म्हणून घेतानाही सहकारी संस्थांनी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, सुरवातीच्या काळात त्यांनी अशी मदत अवश्य घ्यावी पण पुढे शक्य तितक्या लवकर स्वावलंबी बनण्याचे प्रयत्न करावेत. सरकारी किंवा अन्य मदतीचा उपयोग सहकारी संस्थांनी करावा. पण तो पांगुळगाड्यासारखा करावा, कुबड्यांसारखा नव्हे.

या बाबतीत कर्ज पुरवठ्याच्या पद्धतीचा त्यांनी खास उल्लेख केला. ते म्हणाले कर्ज पुरवठ्याची पद्धत आज असमाधानकारक आहे. याचा अर्थ मागितले तेवढे कर्ज सहकारी बँकांकडून दिले जावे असा नाही. तर आपला शेतकरी गरीब आहे. त्याला कुठलीही गोष्ट पटवून त्याचा परिणाम म्हणून त्याला कर्ज मिळावे एवढेच. सहकारी चळवळ स्वावलंबी होण्याबाबत दादांना असलेली तळमळच त्यांच्या या विचारातून व्यक्त होते.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१५६५८

# ८ : मराठी माणसाची व्यथा आणि दादा

काँग्रेस ही स्वातंत्र्यपूर्व काळातील जनमनाची प्रतीक होती. काँग्रेस पक्षाने जनतेच्या इच्छा-आकांक्षा ओळखून कारभार, शिक्षण, लोकशाही, सर्व दृष्टींनी सोयीस्कर अशा भाषिक प्रांतरचनेची कल्पना मान्य केली होती. तशी ती स्वातंत्र्योत्तर काळात करण्यातही आली. दुर्दैवाने संघर्ष, कटुता यासारख्या गोष्टी अल्प प्रमाणात याबरोबर निर्माण झाल्या. पण ती क्षणजीवी ठरणार यात संशय नाही. प्रदीर्घ स्वातंत्र्य संग्रामाच्या काळात राष्ट्रैक्य ही आपल्या जीवनातील सर्वोच्च गरज आहे हे आपण निश्चितच शिकलो आहोत. भाषिक प्रांतरचना करण्यामागेही विशिष्ट उद्दिष्ट व सामान्य जनांचे हित डोळ्यापुढे होतेच. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र निर्माण झाला. ती मागणी करण्यामागेही अर्थातच सामान्य जनांचे हितच डोळ्यापुढे होते. परंतु प्रत्यक्षात मुंबईसह महाराष्ट्र रचनेनंतरही महाराष्ट्रीय, विशेषतः मुंबईतील महाराष्ट्रीय माणसांच्या स्थितीत फारसा फरक पडला नाही. याचे शल्य अनेकांना बोचणे स्वाभाविक होते. आयुष्यभर सामान्य जनांची काळजी वाहणाऱ्या श्री. वसंतराव दादा पाटलांसारख्या नेत्यालाही या गोष्टीची टोचणी मनातून सतत होत राहावी यात आश्चर्य कसले?

मुंबईतील महाराष्ट्रीय जनांच्या हिताकडे लक्ष देण्याची जी मागणी आहे ती रास्त असूनही दुर्दैवाने काही लोकांच्या मनांत याबाबतीत गैरसमज निर्माण झाले. महाराष्ट्राबद्दल अन्य राज्यांतील लोकांमध्ये विनाकारण गैरसमज न होऊ देता, एवढेच नव्हे तर काही गैरसमज निर्माण झाले असल्यास ते देखील दूर करून महाराष्ट्रातील मराठी जनतेला न्याय मिळवून देण्याचे काम आपल्याला करावयाचे आहे हे श्री. वसंतराव दादांनी बरोबर ओळखले व त्यांनी या प्रश्नावर

सातत्याने जी समंजस, दूरदृष्टीची आणि त्याचबरोबर व्यवहारी भूमिका घेतली आहे त्यामुळे मराठी माणसासाठी भरीव आणि विधायक स्वरूपाची योजना अमलात येण्याची शक्यता तर निर्माण झाली आहेच पण त्याचबरोबर महाराष्ट्राच्या न्याय्य भूमिकेची इतरांना खात्रीही पटू लागली आहे. श्री. वसंतराव दादा पाटील म्हणतात भारतातील कोणत्याही नागरिकास भारतात कुठेही जाऊन राहण्याचा, तिथे नोकरी, व्यापार-उद्योग करण्याचा हक्क घटनेतच दिला आहे.

महाराष्ट्राने आजपर्यंत घटनेतील या तरतुदीविरुद्ध कधीच आवाज उठविलेला नाही. उलट अन्य प्रांतांपेक्षा महाराष्ट्रातच विशेषतः मुंबईत विविध भाषिकांची सर्वात जास्त संख्या स्थिर झाली आहे. गुण्यागोविंदाने ते इतकी वर्षे राहात आहेत. एकराष्ट्रीयत्वाच्या भावनेला महाराष्ट्राचा सर्वात कणखर पाठिंबा असल्याची महाराष्ट्राच्या सहिष्णु वृत्तीची यापेक्षा अधिक स्पष्ट साक्ष आणखी काय असू शकेल ? अगदी परवा परवासुद्धा पाकिस्तानातून भारतात आलेल्या निर्वासितांना आपल्या राज्यात सामावून घेण्यात महाराष्ट्राने फार मोठा पुढाकार घेतला आहे. एडन, रंगून, सिंगापूरहून भारतात परतलेल्या शेंकडो निर्वासितांना ते मुंबईच्या बंदरात येऊन दाखल झाले तेव्हा महाराष्ट्राने सरकारी पातळीवरून त्या सर्वांची योग्य सोय करण्याच्या बाबतीत प्रयत्नांची पराकाष्ठा केली. चिनी आणि पाकिस्तानी आक्रमणाच्या वेळी महाराष्ट्रातून गेलेले जवान प्राण पणाला लावून सीमेवर लढले. राष्ट्रैक्य आणि एकराष्ट्रीयत्वाची भावना हा महाराष्ट्रधर्मच आहे. पण महाराष्ट्रातच महाराष्ट्रीय माणसांच्याच काही अडीअडचणी असल्यास त्यांची रास्त गाऱ्हाणी असल्यास, त्यांच्यावर काही अन्याय होत असल्यास तो दूर करण्यासाठी झटणे हे शासनाचेच नव्हे सर्वांचे अन्य भाषिकांचेही कर्तव्य आहे. गरीब लोकांसाठी, कल्याणकारी योजना अमलात आणणे हे आपण आपले कर्तव्य मानतो. मुंबईत बहुसंख्य मराठी माणूस असाच गरीब आणि सामान्य वर्गात वर्षानुवर्षे खितपत पडला आहे. अशा वेळी त्याच्या

उर्जितावस्थेसाठी झटणे यात अराष्ट्रीय असे तर काही नाहीच उलट ते राष्ट्रीय कर्तव्य ठरते. श्री. वसंतराव दादा महाराष्ट्रीय माणसाची ही व्यथा नुसती बोलून दाखवून स्वस्थ बसलेले नाहीत. कोणत्याही समस्येवर वाजवीपेक्षा जास्त नुस्ती चर्चा, वादविवाद करीत न बसता ती समस्या सोडविण्यासाठी मुकाट्याने प्रयत्न करणारे दादा कर्मयोगी आहेत. आपल्या आजपर्यंतच्या पायंड्याप्रमाणे या प्रश्नावरही गाजावाजा न करता मुंबईतील मराठी माणसांच्या उज्वल भवितव्यासाठी भरीव योजना त्यांच्या मनात घोळत आहे. मराठी माणसाच्या विचारांनाही अत्यंत खालच्या थरातील माणसाबद्दलचे विचार प्रथम त्यांच्या मनात येतात.

दादांनी या योजनेची जी रूपरेषा ठरविली आहे त्याबद्दलची माहिती त्यांच्याच शब्दात आपण ऐकली तर दादांच्या दूरदृष्टीची आणि व्यवहारी विधायक दृष्टिकोनाची कल्पना आल्याशिवाय राहात नाही.

दादा या संबंधी बोलताना एकदा म्हणाले, ‘ मुंबईत टाटा हौस, बिर्ला हौस अशा व इतर अन्य भाषिकांची नावे सांगणाऱ्या गगनचुंबी इमारती दिसतात. मराठी मालकीची अशी इमारत कोठे दिसत नाही. कोणत्याच क्षेत्रात मराठी माणूस डोळ्यात भरत नाही. मुंबईचाच माणूस मुंबईचा पहिल्या दर्जाचा नागरिक नाही हे मनाला सलते. त्यात पालट घडवून आणावा असे माझे स्वप्न आहे व त्या दृष्टीने प्रयत्न करण्याचा माझा मानस आहे. ’ मुंबईत विभागशः व व्यवसायपरत्वे सहकारी बँका स्थापन करून त्या विभागात तो व्यवसाय करणाऱ्याला भांडवल पुरविणे, धंदेवाईक दृष्टीचे शिक्षण त्याला देणे, बचत करण्याची सवय त्याला लावणे व अशा बँकेचा छोटा, मोठा शेअर त्याला देऊन त्यात भागीदार बनवून जबाबदारीचे धडे त्याला देणे ही कामे सहकारी बँकांनी करावीत अशी त्यांची योजना आहे. मुंबईत सध्या अशी एक सहकारी बँक आहे. पण सहकारी बँक मुंबईतील एखाद्या विभागापुरती असेल तर ती जास्त उपकारक ठरेल. उदाहरण देऊन आपली योजना विशद करताना

दादा म्हणाले, हातगाड्यांचा धंदा करून वाहतूक, मजुरी करणारे अनेक कष्टकरी लोक मुंबईत आहेत. त्यांना विशेष भागांपुरती सहकारी बँक साहाय्य करू शकेल. त्यांच्यावरच देखरेख ठवून त्यांच्याजवळ जी शिल्लक दिवसाकाठी राहील ती बँकेत जमा करावयास प्रवृत्त करील व सर्व देणी-घेणी चेकरूपाने कशी करावी हे त्यांना बँकेचा मनुष्य शिकवील. त्याला तोटा येत असेल तर तोटा टाळण्यासाठी काय करावयास पाहिजे याचेही संशोधन करून हातगाडीवाल्यांना मार्गदर्शन केले जाईल. त्याला धंद्यासाठी मदत पाहिजे असेल तर त्याची पत विचारात न घेता अशी मदत देखील बँक त्याला करील. अशी धंद्याची व अर्थव्यवहाराची दृष्टी हातगाडीवाल्याला आली म्हणजे मोलमजुरी न करता तो स्वतःच लोकांच्या गरजेप्रमाणे त्यांना घरपोच माल पोहचवू लागेल. आणि प्रत्येक घरी लागणारे धान्य जर व्यवस्थित पिशव्यांच्या स्वरूपात तो घरोघर बाजारापेक्षा स्वस्त भावाने पुरवू शकला तर त्याला रोकडीवर गिऱ्हाईके मिळण्यास पंचाईत पडणार नाही. अशा रीतीने हातगाडीवाला छोटा धंदेवाला झाला की, त्याला हवा असलेला माल बँकेमार्फत पुरवला जाईल. मजुरी व अशा व्यवसायांतील नफा यांची प्राप्ती त्याला होऊ लागली की, त्याचा व्यापार वाढून आत्मविश्वास दुणावेल. आज आर्थिक व्यवहार म्हणा किंवा व्यापार म्हणा यात असा आत्मविश्वास आपल्यात निर्माण होणे सर्वांत महत्त्वाचे आहे. हातगाडीवाल्याची अशी संघटना झाली की, हातगाड्या तयार करणाऱ्या सुतारकाम करणाऱ्यांची अशीच सहकारी बँक स्थापन करून व्याप वाढविता येईल.

अशा सहकारी बँका विभागशः व व्यावसायिक स्थापन झाल्या तर शेअर भांडवल एखाद्या लाखाचे जमू शकेल. तेवढीच किंवा त्याहून अधिक रक्कम बँकेला सरकारकडून मिळेल व बँकेचे भांडवल दोन लाखांचे झाले की, राज्य सरकारी बँकेचे तेवढेच कर्ज मिळून सुमारे पाच लाखाची उलाढाल अशा विभागीय बँका करू लागतील. व पाच दहा वर्षांत त्यांना दहा पंधरा लाखांचा व्यवहार करता येईल.

हातगाडीवाल्यांसारखेच मुंबईत अनेक कष्टकरी लोक आहेत त्यांना धंदेवाईक दृष्टी देऊन बचतीची संवय लावली आणि बँकेच्या देख-रेखीखाली जरूर ते आर्थिक साहाय्य केले तर मुंबईत मोलमजुरी करून राहाणाऱ्या कष्टकारी लोकांची स्थिती हळूहळू पालटणे शक्य होईल.

सामान्य कष्टकरी लोकांना स्वावलंबी व्यवसाय धंद्यास लावण्याच्या अशा उपक्रमाबरोबरच मध्यम वर्गीयांचे, छोटा व्यवसाय धंदा करणाऱ्यांचे, प्रश्न सहकारी बँकांमार्फत याच पद्धतीने हाताळता येतील. उदाहरणार्थ औषधी कारखाने मध्यमवर्गीय लोक चालवीत असतात. पण चढाओढीमध्ये ते टिकू शकत नाहीत. नुकसानीत चाललेल्या धंद्यास कर्ज मिळत नाही व अखेर धंदा बंद करण्याची पाळी येते. अशा व्यावसायिकांसाठी देखील सहकारी बँक काढून त्या लोकांना जगविता येईल. महाराष्ट्रभर सहकारी विक्रेत्यांचे संघ होऊन माल चांगल्या नमुन्याबरहुकूम व चोख असेल तर अशा व्यावसायि-यिकांनी तयार केलेल्या मालाची विक्री सहकारी विक्रीमंडळांमार्फत होऊ शकेल. भांडवलाची खात्री, मालाच्या विक्रीची व्यवस्था, हुकूमी गिऱ्हाईक व औद्योगिक दृष्टी तसेच त्यासाठी जरूर ते प्रशिक्षण देण्याची व्यवस्था विभागशः व व्यवसायपरत्वे स्थापन होणाऱ्या बँकां-मार्फत झाली तर स्वावलबी कष्टकरी व छोटे मोठे व्यवसाय करणारे यांना एक मोठा आधार मिळाल्यासारखे होईल. त्यांच्या धंद्यांना शाश्वती लाभून त्यात जरूर ती बरकतही होत राहील. धंद्यात मिळ-णारा नफा बँकेत ठेव रूपाने ठेवला तर सहकारी बँकांची साहाय्य करण्याची ताकदही वाढली जाईल.


अशा विभागीय व व्यवसायनिहाय सहकारी बँकांमध्ये लोक ज्या ठेवी ठेवतील त्यांना सरकारमार्फत हमी मिळवून देता येईल व ठेवी ठेवणारे निर्धास्त होतील.

अशा सहकारी बँकांच्या योजनेमुळे आणखी एक मूलभूत फरक पडण्याची जी शक्यता आहे त्यावर वसंतराव दादांचा विशेष भर आहे. असे विभागीय व व्यवस्थानिहाय सहकारी बँकांचे जाळे



दादांनीं शेतकऱ्यांची शेतेच फुलवली नाहीत तर जीवनही फुलविले.

आणि म्हणूनच दादा जेथे जातील. तेथें त्यांच्या भोवती शेतकऱ्याचा व लोकांचा गराडा पडतो.





श्री. व सौ. वसंतदादा पाटील यांचे समवेत लेखक श्री. सुधाकर सामंत (दादांचे शेजारी), (डावीकडे) दादांचे खाजगी सहाय्यक श्री. विश्वासराव जाधव व (उजवीकडे) सेवक श्री. राम.



लेखकाचे प्रेरणास्थान आणि लेखक

पसरले की, स्वतंत्र व्यापार, उद्योग, व्यवसाय करणाऱ्यांना भांडवल, मार्गदर्शन व गिऱ्हाईकांची हमी मिळून व्यापार धंद्यातील जे धोके असतात त्यांचे बुजगावणे मराठी तरुणांना वाटणार नाही. स्वतंत्र उद्योगधदे करून आर्थिक उन्नति करून घेता येते व नोकरीपेक्षा जास्त कमाई करता येते व असे एकदा इतरांच्या उदाहरणावरून दिसून आले की, स्वाभाविकच महाराष्ट्रात नोकरी पेशाची जी आसक्ती आहे ती ओसरू लागेल व उद्योग व्यवसायाबद्दल त्यांना आकर्षण वाटायला लागून महाराष्ट्रातील बुद्धिमान व धडाडी असलेले लोक स्वतंत्र व्यवसायाकडे वळू लागतील.

कोणत्याही प्रश्नाच्या मुळाला हात घालून तो प्रात्यक्षिक आणि व्यवहारी दृष्टिकोणातून सोडविण्याच्या दादांच्या चतुर आणि धोरणी मनोवृत्तीचेच यथार्थ दर्शन त्यांच्या या योजनेतून घडते. दादा नुसते कागदोपत्री योजना आखून थांबणारे नाहीत. योजना प्रत्यक्षात आणण्याच्या दृष्टीने त्यांचे प्रयत्न सुरूही झाले आहेत. मराठी माणसाची पिछेहाट थांबली पाहिजे, मराठी माणसांनी उद्योगधंद्यात लक्ष घातले पाहिजे, असा आक्रोश आज अनेक जण अनेक वर्षे करीत आले आहेत. पण त्या दृष्टीने काही तरी प्रत्यक्ष करण्याचे आजपर्यंत कुणाला सुचले नाही सामान्य जनांबद्दलची कळकळ, विधायक कार्याची दृष्टी आणि प्रत्यक्ष कार्य करण्यावर अधिक भर देण्याच्या दादांच्या मनोवृत्तीतून जन्मास आलेली ही कल्पना दादांच्याच नेतृत्वाखाली व मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे अंमलात आल्याशिवाय राहाणार नाही. कोणत्याही प्रश्नाचा साधकबाधक विचार करून त्यावर एकदा निर्णय घेतल्यानंतर त्याची अंमलबजावणी करण्यात दादांकडून कधी कसूर व्हायची नाही. महाराष्ट्रीय माणसासंबंधीच्या या योजनेवर संकुचितपणाची टीकाही होण्याची शक्यता असल्याची जाणीवही त्यांना आहे. त्याबाबत ते म्हणतात, 'मुंबईतील मराठी माणूस हा महाराष्ट्राच्या निरनिराळ्या भागांतूनच मुंबईत भरणा झालेला आहे व महाराष्ट्रातील आपल्या जन्मगावची ओढ त्याला असणे स्वाभाविकच आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून

मुंबईत आलेल्या मराठी माणसास अव्वल दर्जाचे स्थान मुंबईत मिळावे व मराठी माणसाच्या मनातील एक शल्य दूर व्हावे म्हणून प्रयत्न करण्यात प्रादेशिकता किंवा संकुचीतपणा नाही. किंबहुना ते महाराष्ट्राचे कर्तव्य आहे. आमची भूमिका स्पष्ट करण्याचा आम्ही वेळोवेळी प्रयत्न केला आहे आणि ती समजून सांगण्यास मी केव्हाही तयार आहे. आम्ही संकुचित दृष्टी कधी ठेवली नाही आणि या योजनेतही संकुचित दृष्टी नाही हे मी स्पष्ट केलेच आहे. इतके करून देखील आमच्यावर संकुचितपणाचा आरोप हेतुपुरस्सर लादण्याचा जर कुणी प्रयत्न केला तर तोच संकुचित दृष्टिकोण म्हणावा लागेल. खोटे व निराधार आक्षेप घेतले गेले तर त्याला आपला काय इलाज आहे ? ' अशा आक्षेपांकडे दुर्लक्ष करून सामान्य जनांच्या हितासाठी आपले प्रयत्न कणखरपणे चालू ठेवण्याचा दादांचा निर्धार आहे. महाराष्ट्रीय माणसाकडून या बाबतीत अपेक्षित सहकार्याबद्दल दादा गंभीरपणे म्हणतात, ' आपण या बाबतीत स्वप्नाळू दृष्टी न ठेवता सत्यदृष्टि ठेवली पाहिजे आणि खूप कष्ट करण्याची तयारी असली पाहिजे. या दोन गोष्टी महत्त्वाच्या आहेत. व्यापार, उद्योगधंद्यात पडायचे म्हणजे जादूची कांडी फिरविल्याप्रमाणे एका रात्रीत आपल्या खिशात पैशांचा खुळखुळाट होऊन आबादीआबाद होईल अशी कल्पना कुणी करून घेऊ नये. व्यापारवृद्धी होण्यास कधी कधी जन्मभर आणि कधी कधी पिढ्यान् पिढ्या कष्ट करावे लागतात. तात्काळ फळाची अपेक्षा न करता तोटा, माघार, या संभाव्य अडचणींना तोंड देण्याची तयारी ठेवून धाडसाने मराठी माणसाने या क्षेत्रात पदार्पण करून जिद्दीने धडपड केली पाहिजे. सरकार काय किंवा अन्य कुणीही काय, उत्तेजन देण्याची, बुडत्याला आधार देण्याची भूमिका बजावू शकतील. प्रत्यक्ष हातपाय हलवून तरंगत राहाण्याचे काम ज्याचे त्यानेच केले पाहिजे. झटपट बंगला बांधण्याच्या, मोटारगाड्या बाळगण्याच्या वेड्या कल्पना आपण उराशी बाळगू नयेत. आपल्याला फार मोठा पल्ला गाठायचा आहे. कोणत्याही व्यापार वा उद्योगधंद्यात

स्पर्धादेखील असणारच. मी हे सगळे आपल्या लोकांना नाउमेद करण्यासाठी सांगत आहे असे नाही. पण कोणत्याही गोष्टीचा विचार करताना आपले पाय जमिनीवर असले पाहिजेत. हवेत तरंगण्याने काही साध्य होणार नाही. सत्यपरिस्थितीची कल्पना आधी असली म्हणजे भविष्यकाळात अपेक्षाभंगाचे नैराश्यही पदरी पडणार नाही. निष्ठा आहे. बुद्धिमत्ताही आहे. आपल्या तरुणांनी नोकरीची आसक्ति सोडून साहसी वृत्तीने स्वतंत्र व्यवसायात पडावे. लोकांची उपक्रमशीलता व कष्ट आणि विभागीय सहकारी बँकांसारख्या संस्थांचे मार्गदर्शन व सहकार्य यांतूनच आपल्या सामान्य जनांना चांगले दिवस येतील.

# ८ : सामान्यांचा असामान्य नेता

मुंबईतील वसंतराव दादांची कचेरी. काही अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नांवर वाटाघाट करण्यासाठी दादांच्या भेटीसाठी काही बडे लोक आले होते. दादा नुकतेच दुसरे एक महत्त्वाचे काम आटोपून घाई-घाईने आले होते. तेवढ्यात एक टेलिफोनची घंटा वाजली. दादा टेलिफोनवर बातचीत करीत होते. तोपर्यंत ती भेटीसाठी आलेली मंडळी पुनः खोळंबली. दादांचे फोनवरचे संभाषण आटोपते न आटोपते तोच एक कामगारासारखा दिसणारा सामान्य माणूस बिचकत दबकत दादांच्या जवळ घुटमळू लागला. दादांचे त्याच्याकडे लक्ष गेले. दादांनी काय पाहिजे म्हणून पृच्छा केली. त्या माणसाच्या सांगण्यावरून, तो आधी अपॉईंटमेंट वगैरे न घेताच दादांच्या भेटीला आला होता आणि बराच वेळ दादांची वाट पाहात बसला होता. दादांनी त्याच्या खांद्यावर थाप मारून कामाविषयी चौकशी केली. त्यानंतर जवळ जवळ वीस पंचवीस मिनिटे तो माणूस आपले गाऱ्हाणे दादांना सांगत होता. तो मुंबईतील कोणत्यातरी चाळीत एका खोलीत राहात होता. त्या खोलीसंबंधी त्याचा आणि घरमालकाचा काही तरी वाद होता. आणि त्याला घरमालकाकडून काही तरी त्रास होत होता.

आता वास्तविक दादांना प्रत्यक्षपणे त्यात काही करता येण्यासारखे होते असे नाही. पण त्या माणसाचे म्हणणे सुरुवातीस थोडे ऐकल्यानंतर दादांच्या हे लक्षात आले होते. पण दादांनी त्याचे सगळे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले. त्याचे नाव, गाव, पत्ता, वगैरे लिहून घेतला. त्याला त्याच्या प्रश्नात लक्ष घालण्याचे आश्वासन दिले आणि पुनः केव्हाही विनासंकोच यायला सांगितले.

खोळंबलेल्या मंडळींना जास्त वेळ वाट पाहात बसावे लागल्या-

बद्दल नंतर दादांनी अर्थातच त्यांची प्रथम क्षमा मागितली आणि वाटाघाटीचा पुढचा कार्यक्रम सुरू झाला.

नंतर ती बैठक वगैरे आटोपल्यानंतर आपण एवढे महत्त्वाच्या कामात असतानाही त्या किरकोळ माणसाचे क्षुल्लक गाऱ्हाणे ऐकण्यात एवढा वेळ का घालवलात असे एकाने विचारले. दादा म्हणाले, ' अहो कोण किरकोळ आणि कोण बडा. सगळीच माणसे. तो बिचारा दोन तास माझी वाट पाहात बसला होता. त्याने त्याच्या नोकरीतून कसा-तरी वेळ काढला असेल. पुन्हा त्याला केव्हातरी यायला सांगायचे म्हणजे त्याला वेळ काढणे आणि बसचे पैसे खर्च करणे दोन्ही अडचणीचेच. आणि त्याचे गाऱ्हाणे म्हणाल तर आपल्या दृष्टीने ते कदाचित् किरकोळ असेल; त्याच्या दृष्टीने प्रश्न किती महत्त्वाचा होता हे तो किती कळवळून बोलत होता यावरून दिसले नाही का ? '

असे कितीतरी लोक–किरकोळ, सामान्य लोक–दररोज दादांच्या भेटीला येतात. दादा कुणालाही दुखवीत नाहीत की कुणालाही झिडकारीत नाहीत. सर्वांची अत्यंत सहानुभूतीने चौकशी करतात. त्यांचे म्हणणे ऐकतात. नुसतेच ऐकतात असे नव्हे तर त्या प्रत्येक माणसाचे प्रश्न सोडविण्यासाठी आपल्या परीने प्रयत्न करतात. सामान्य जनांच्याबद्दल सहानुभूती वाटत असल्याचे हे नाटक नव्हे. त्यांच्यासाठी काहीतरी करावे अशी जी सतत कळकळ दादांना आहे त्या कळकळीचा तो परिपाक आहे. दादांचे सार्वजनिक आयुष्य अशा सामान्य माणसांसाठीच आहे. त्यांच्यासाठीच त्यांनी जिवाचे रान केले आहे. दादा स्वतः अशाच गरीब घरात जन्मास आले आहेत. त्यामुळे गरीबांची दुःखे त्यांना बरोबर माहीत आहेत. गरीब कुटुंबात जन्म, गरिबीतच लहानाचे ते मोठे झाले. पुढे राष्ट्रीय कार्यात पडले. बेचाळीसच्या चळवळीत सामील झाले. त्यांतही दादांचे साथीदार सर्व गरीब, शेतकरी कुटुंबांतले. शिवाजी महाराजांनी जमविलेल्या मावळ्यांसारखे. त्यांच्याशी खांद्याला खांदा लावून लढले. रानावना-तून ब्रिटिश पोलिसांचा डोळा चुकवीत भटकले. झोपड्यांतून, शेतांतून आश्रय घेतला. मिळेल त्या भाकरीवर गुजराण केली. सातारा

सांगलीच्या गरीब शेतकरी वर्गातील लोकांतच दादा वावरले. त्यांनीच दादांना अनेक वेळा जिवाच्या जोखमीवर आसरा दिला. दादांनी भूमिगत राहून राष्ट्रकार्य करताना झोपड्याझोपड्यांतून, खेड्याखेड्यांतून स्वातंत्र्याची ज्योत पेटविली. अशा रीतीने दादांच्या तरुणपणीचा आणि राष्ट्रीय चळवळीतील सुरवातीचा काळ सामान्य जनांमध्येच गेला. दादांचा पिंडच त्यामुळे तसा बनला. सामान्य जनाच्या हिताचे रक्षण कसे करता येईल हाच त्यांना सतत ध्यास असतो.

त्यामुळेच स्वातंत्र्यप्राप्तीनंतर दादांनी आपल्या सार्वजनिक जीवनाच्या दुसऱ्या पर्वास जेव्हा सुरुवात केली तेव्हा त्यांच्या मनापुढे पहिल्यांदा खेड्यातील शेतकरी, डोंगरकपारीत राहाणारा आदिवासी, झोपड्यातून रहाणारा गरीब माणूस उभा राहिला. त्याच्यासाठीच काहीतरी करण्याची तळमळ साहाजिकच दादांना लागली होती. दादांनी मनात आणले असते तर स्वातंत्र्य चळवळीत त्यांनी केलेल्या त्यागाच्या जोरावर स्वातंत्र्योत्तर काळात एखादी नुसती मान-सन्मानाची चांगली आर्थिक प्राप्तीची जागा पटकावून पुढचे आयुष्य ऐषारामात घालविता आले असते. परंतु स्वातंत्र्य चळवळीत केलेल्या त्यागाचे त्यांना भांडवल करणे पसंत नव्हते. 'चळवळीत मी जे काही यथाशक्ती कार्य केले ते काय कुणावर उपकार म्हणून! माझे ते कर्तव्यच होते!' असे दादा म्हणतात. स्वातंत्र्य चळवळीत जे प्राणास मुकले, ज्यांनी आत्मबलिदान केले त्या हुतात्म्यांचा त्याग तो खरा त्याग. आईसाठी मुलाने काही केले तर तो काय त्याग? भारतमातेसाठी आपण परकीय सत्तेशी लढलो तो का त्याग? ते आपले कर्तव्यच होते. अशी दादांची विचारसरणी. ज्या सामान्य माणसाच्या भल्यासाठी स्वातंत्र्य मिळविले ते साध्य करण्यासाठी काय करावे याचा विचार करीत तासन् तास कृष्णाकाठी दादांनी चिंतनात घालविले. आजही थोडी कुठे उसंत मिळाली तर तेव्हढ्या वेळातही दादांची कुठे तरी समाधी लागलेली असते. समाधीत त्यांना दर्शन घडते–देवाचे–जनताजनार्दनाचे.

‘दादा आपल्या आयुष्यात सर्वांत सुखाचा क्षण कोणता?’ मी दादांना विचारले.

दादा म्हणाले आपल्या देशातील प्रत्येक शेतकरी, कामकरी ज्या दिवशी सुखी दिसेल तो दिवस, तो क्षण सुखाचा असे मानीन. गरीब, दुःखी म्हणून बोट दाखवायला एकही माणूस आपल्या देशात ज्या दिवशी राहाणार नाही तो दिवस भाग्याचा. हा दिवस लवकर उगवावा यासाठीच आपण सर्वांनी प्रयत्न करावयाचे आहेत. सत्ताही त्याचसाठी राबवायची आहे.’

‘या कामी विरोधी पक्षाचेसुद्धा सहकार्य हवे का?’ या प्रश्नाला उत्तर देताना ते म्हणाले, ‘विरोधी पक्ष म्हणजे काय? सर्व पक्षांचे राजकीय मार्ग फक्त भिन्न आहेत. सामान्य जनांचे कल्याण साधणे हा सर्वांचाच अंतिम उद्देश. तेव्हा त्या बाबतीत मतभेद असूच नये. विविध मार्गांनी विविध पक्ष जात आहेत. पण ध्येयशिखर एकच आहे.

# १ : पद्माळे ते मुंबई, मुबई ते--

असे हे अनेक क्षेत्रातील दादा. पण दादागिरीचा मात्र लवलेश नाही. दादा जसजसे एकापेक्षा एक उच्च जबाबदारीच्या स्थानी विराजमान झाले तसे ते अधिकच विनयी नम्र होत गेले. या नम्रतेतच त्यांचे सारे मोठेपण सामावले आहे. खेड्यातील तांबडमातीत, ओबडधोबड ग्रामीण वातावरणात वाढलेले, अशिक्षित दादा आज एवढ्या उच्चपदावर पोहोचले आहेत. पण पद्माळ्यातील दादा आणि मुंबईतील वसंत दादा यात काहीही फरक झालेला नाही. किंवा मुंबईहून आणखी कुठे पुढे जाण्याची त्यांची स्वतःची महत्त्वाकांक्षाही नाही. आपली जीवनात काही महत्त्वाकांक्षा आहे काय असे दादांना विचारले. दादा चटकन् म्हणाले, 'दुःखी लोकांचे अश्रु पुसण्याचा मी माझ्या परीने आजपर्यंत प्रयत्न केला आहे. तेच प्रयत्न यापुढे चालू ठेवणे एवढीच माझी महत्त्वाकांक्षा. परमेश्वराने त्यासाठी मला शक्ती द्यावी एवढीच माझी इच्छा आहे.' आपल्या राज्यात, देशांत, आज बहुसंख्य लोक असे दुःखी आहेत. त्यांचेच अश्रु पुसण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणारे फार थोडे लोक आहेत. महाराष्ट्राच्या पुण्यभूमीने अनेक नरवीरांना जन्म दिला आहे. महाराष्ट्रात संपत्तीची वाण असेल, पण शूरांची आणि सत्पुरुषांची वाण महाराष्ट्रात कधी पडली नाही. दादांसारख्या माणसाकडे पाहिले म्हणजे ती वाढ यापुढेही पडणार नाही याची खात्री वाटते.

दादा कॉंग्रेस पक्षातील एक कार्यकर्ते आहेत. पण अन्य कोणत्याही पक्षातील माणसाचेही दादांच्या कार्याबद्दल, कर्तबगारीबद्दल दुमत नाही. माणूस अखेर त्याच्या पक्षावरून, त्याच्या कपड्यावरून किंवा रंगरूपावरून ओळखला जात नाही. तो ओळखला जातो त्याच्या कार्यावरून. दादांनी अबोलपणे केलेले कार्य आणि लोक-

संग्रह आजच्या काळात फार अमोल आहे. देशातील सर्वांत मोठा असा हा काँग्रेसपक्ष आज छिन्नभिन्न होण्याच्या अवस्थेत आहे. त्या पक्षात दादांसारख्या लोकसंग्राहकाची खरी आवश्यकता आहे. महाराष्ट्रात काँग्रेस हा आजही जनतेचा प्रातिनिधिक पक्ष आहे. याला कारण .दादांचा जनतासंपर्क, त्याच बरोबर काँग्रेसमध्ये असलेल्यांना त्यांनी दिलेली विधायक कार्याची दृष्टी ही देखील फार मोठी देणगी आहे. दादांनी सुरू केलेल्या सहकारी मोहिमेची पाळेमुळे महाराष्ट्रात खोल रुजत आहेत. सामान्य जनांना आपल्याबरोबर नेण्याची आणि कार्यकर्त्यांना विधायक कार्यास जुंपण्याची दादांची कर्तबगारी सबंध देशाला मार्गदर्शक ठरणारी आहे. दादांना सत्तेचा लोभ नाही. मंत्रीपदाची हाव नाही. पण दादांच्या या दोन महान गुणांचे चीज काँग्रेसमध्ये होऊन राज्य-पातळीवरील त्यांच्या नेतृत्वाचा अखिल भारतीय पातळीवर उपयोग उद्या करून घेण्यात आल्यास ते सबंध देशाच्या हिताचे ठरणार आहे.

दादा सामान्य जनांचे अश्रू पुसण्यासाठी झटत आहेत. सामान्य माणसाजवळ त्यांना देण्यासाठी काहीही नसले तरी निष्ठा आणि प्रेम त्यांनी दादांना दिले आहे. जनता त्यांच्या पाठीशी उभी आहे. या जनता जनार्दनाच्या आशीर्वादाने दादांचा उत्तरोत्तर उत्कर्ष होत जाणार हे निश्चित.

## १० : जनताजनार्दनाने दिलेली पावती

सामान्य जनांचा असा हा असामान्य नेता. अगदी सामान्य शेतकरी, कामगारापासून तो राजकीय नेते, लेखक, साहित्यिक, मंत्री उपमंत्री यासारख्या असामान्य लोकांपर्यंत सर्व थरांतील माणसांनी दादांच्या कार्याची खुल्या दिलाने आणि मुक्त कंठाने प्रशंसा केली आहे.

दादांच्या कर्तबगारीबद्दल जनताजनार्दनाने दिलेल्या प्रशस्ती पत्रकातील काही भाग येथे दिले आहेत.

### शेतकरी

दादा फार थोर माणूस. मी गरिबानं काय त्यांच्याबद्दल सांगावं ? पन् येवढंच खरं की असा माणूस शोधूनबी सापडणार नाय. फार वर्षांपूर्वींची गोष्ट आठवते. एकदा दादा खेड्यापाड्यातून हिंडता हिंडता माझ्या गावी आले होते. दादा तेव्हा सांगलीला होते. माझ्या शेतावरून जाताना शेतातील विहीरीचे काम चालू होते ते त्यांनी पाहिले. माझ्या शेतीची, पिकांची चौकशी केली. दादा दोन वर्षांनी परत भेटले, ते सांगलीला. अन् मला भेटल्याबरोबर त्यांनी पहिला प्रश्न विचारला, 'काय पाटील, विहीरीचं कुठवर आलं ?' अन् मग तर दादांनी विहिरीला इंजन पण लावून दिलं.

आता मागल्याच महिन्यात मुंबईला गेलो होतो तर तिथंबी दादा भेटले. घरी नेलं. मांडीला मांडी लावून बसवलं आणि जेवल्या-बिगर जाऊच दिलं न्हाय बघा. आता तुम्हीच सांगा एवढ्या मोठ्या माणसाच्या घरी आम्ही कसं जेवावं ? पण दादा म्हणे—अरे मोठा कसला ? हाय तेवढाच हाय की ! मोजून बघतो का जरा ! अशी

गंमत आहे आमच्या दादांची. मुंबईला गेले पन मला वाटतं उद्या. विलायतेला गेले तरी ओळख विसरणार नाहीत कदी. अन् मीच काय आमच्या गावाकडं कुणाला पण विचारा. हेच्च सांगतील सगळे- गावाकडं आल्यावर प्रत्येकाची मायेनं विचारपूस करतील. पोरा· टोरांची शाळा कशी चालली म्हणून चौकशी करतील. एखाद्याच्या घरी जेवायला पण थांबतील आणि असेल ती भाकरी खातील.

दादा कुठेबी गेले तरी आमचे दादा आहेत असंच आम्हाला वाटणार. परमेश्वर त्यांना उदंड आयुष्य देवो.

**अण्णासाहेब मगदुम**
अंकळी, जि. सांगली

## जुना मित्र

दादांचा आणि माझा परिचय फार जुना आहे. आमच्या गावठी भाषेत सांगायचं तर आम्ही लंगोटी मित्र. वसंता आणि मी एकाच शाळेत होतो. शाळेत हा मुलगा कधी फारसा अभ्यासू किंवा उत्कृष्ट खेळाडू किंवा अन्य कोणत्याही क्षेत्रात विशेष चमकत नव्हता. पण तरी तो त्यावेळीही इतरांपासून वेगळा मात्र वाटायचा हे खास. त्यावेळी हा मुलगा आजच्या सारखाच मितभाषी, लाजाळू, पण प्रामाणिक, कष्ट करणारा आणि चौकस वृत्तीचा. कुस्त्यांचे काही फड मात्र त्याने गाजवलेले मला चांगलेच स्मरतात. पुढे त्याचा माझा विशेष संबंध राहिला नाही. पण बेचाळीसच्या क्रांतीत वसंतराव पाटलांचे नाव हळूहळू सर्वत्र ऐकू येऊ लागले. एक क्रांतिकारी म्हणून त्यांना लोक ओळखू लागले. विद्यार्थी दशेतील सर्वसामान्या- सारखा व इतरांहून वेगळा वाटणारा वसंता पाटील मला तेव्हा आठवला. त्याच्या डोळ्यातील विलक्षण चमक मला आठवली आणि तो मुलगा इतरांहून वेगळा वाटला ते किती बरोबर होते याची खात्री पटली. दादा भूमिगत असताना एकदा मला भेटल्याचे आठवतात.

चांगलेच आठवतात. चैतन्याने रसरसलेली दादांची ती ज्वलंत मूर्ती आजही माझ्या डोळ्यासमोर आहे. जीवनावर उदार बनलेल्या दादांची बेफिकीर मनोवृत्ती त्यांच्या बोलण्यात तेव्हा स्पष्ट दिसत होती.

त्यानंतरची त्यांची कीर्ती इतरांप्रमाणे माझ्याही कानावर येत राहिली. मला खूप बरे वाटायचे. दादाही अनेक वेळा त्यानंतर भेटले आहेत. लहानपणी खांद्यावर हात टाकून गप्पा मारणारा दादा— आज देखील तोच कायम आहे. तेच रांगडे दिलखुलास बोलणे, तोच जिव्हाळा, मुंबईला केव्हाही जाण्याचा प्रसंग आला तर त्यांच्याच-कडे उतरण्याची सक्त ताकीद दादांनी मला दिली आहे. आणि त्यांच्या प्रेमाचा एवढा वचक आहे की ती ताकीद मी कधी मोडू शकलेलो नाही. एक प्रसंग मला आठवतो. मी एक दिवसाच्या कामाकरता मुंबईस गेलो होतो. म्हटलं दादा मोठा माणूस, खूप कामे आहेत त्यांच्या मागे. तेव्हा एक दिवसासाठी त्यांना कशाला त्रास द्या. म्हणून मी एका नातेवाईकाकडे मुक्काम केला होता. दुसऱ्या दिवशी सकाळी परत गावाकडे निघायचे होते.

पण रात्री दहा साडेदहाच्या सुमारास दादा माझ्या मुक्कामी दत्त म्हणून हजर झाले !

म्हणाले, ' तूं आल्याचं कळलं. तुला वेळ नव्हता असं दिसतं. म्हणून मुद्दाम तुला भेटायला आलोय ! ' तेव्हापासून मी दादांना भेटल्याशिवाय जाण्याची चूक करीत नाही.

**भवरीलाल लड्डा**
सांगली

# सहकारी कार्यकर्ता

पूर्वी मी या क्षेत्रांतील एक मामुली कार्यकर्ता असताना श्री. वसंतराव-दादा पाटील यांना भेटण्याची मला संधी मिळाली होती. आता जरी आमचा रोजचा सहवास आहे तरी त्यावेळी मी प्रथमच त्यांच्या भेटीला जात होतो. सहकारी क्षेत्रातील एवढ्या मोठ्या

माणसाला भेटायला जाताना मी मनातून थोडा दबकतच होतो. मी या क्षेत्रातील एक मामुली कार्यकर्ता. मी त्यांच्याशी काय बोलणार ? कसा तिथे वागणार, या कल्पनेने मी अस्वस्थ झालो होतो. पण त्यांची भेट झाली मात्र आणि–पहिल्या त्यांच्या स्मित हास्यानेच माझी अर्धी भीती पळाली. पालकाने मुलाची विचारपूस करावी तशी माझी, माझ्या कामाबद्दलची त्यांनी चौकशी केली. मला काही अडचणी आहेत का म्हणून विचारले. मी माझ्या मित्राशी गप्पा मारतो आहे असेच मला वाटले. दादांनी पुनः केव्हाही येण्याचे आमंत्रणही दिले. मी त्या आमंत्रणानुसार त्यानंतर बऱ्याच वेळा दादांकडे गेलो आहे. कधी कामासाठी, कधी सहज. पण पहिल्या भेटीच्या वेळी होता तो माझ्यातील संकोच कुठच्या कुठे नाहीसा झाला आहे. सहकारी संस्थेच्या कामकाजा-बद्दल अनेक वेळा दादांशी बोलणे झाले आहे. आणि दादांकडून या बाबतीत मी जे काही शिकलो आहे ते पुस्तकात मला शिकायला मिळाले नाही. दादांनी वेळोवेळी केलेल्या सूचनांव्यतिरिक्त त्यांचा मला जो काही अल्प परिचय झाला आहे या अल्प परिचयातून इतरांशी कसे वागावे, कसे बोलावे हा दादांचा महान् गुण मला सतत मार्गदर्शक ठरला आहे. सहकारी कार्यकर्त्यांच्या एका बैठकीत दादांनी सांगितलेले शब्द आजही माझ्या स्मरणात आहेत. ते म्हणाले होते, ‘ आज यांत्रिक युगात शास्त्रज्ञांचा उपकरणांशी, इंजिनियरांचा हत्यारांशी, तंत्रज्ञांचा यंत्राशी संबंध येतो. सहकारी कार्यकर्त्यांचा संबंध मात्र जिवंत माणसांशी येतो. त्यांचे कार्यही तसेच जिवंत असले पाहिजे. हा फरक लक्षात ठेवून कार्यकर्त्यांनी सतत वागले पाहिजे. सहकारी कार्यकर्त्यांचे कार्य म्हणजे युगप्रवर्तकाचे कार्य आहे हे आपण ध्यानात ठेवा.

**दिनकरराव हिंदुराव पाटील**
अंकलखोप, जि. सांगली

## उपराष्ट्रपती

वसंतराव दादा पाटील म्हणजे आपल्या देशातील एक खंदे विधायक कार्यकर्ते आणि महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची प्रेरणाशक्ती. त्यांचे जीवन जितके आदर्श तितकेच स्फूर्तिदायक आहे. भारतातील उगवत्या पिढीने दादांच्या चैतन्यमय जीवनाचे अनुकरण केले पाहिजे.

**व्ही. व्ही. गिरी**
उपराष्ट्रपती

## गृहमंत्री

वसंतरावदादांनी गेली अनेक वर्षे महाराष्ट्रात केलेले विधायक कार्य सर्वांच्या परिचयाचे आहे. विशेषतः सहकारी क्षेत्रातील त्यांची कामगिरी वाखाणण्यासारखी आहे. त्यांच्या चिकित्सक बुद्धिमुळे व सर्वांच्या बरोबर काम करण्याच्या प्रवृत्तीमुळे त्यांनी नवीन कार्यक्षेत्रे धुंडून हाती घेतलेल्या जबाबदाऱ्या पार पाडल्या आहेत. त्यांच्या अनुभवाचा व कार्याचा लाभ अखिल महाराष्ट्रातील जनतेला मिळो.

**यशवंतराव चव्हाण**
गृहमंत्री, भारत सरकार

## मुख्यमंत्री, महाराष्ट्र

स्वातंत्र्योत्तर काळात लोकशाही समाजवाद प्रत्यक्षात उतरविण्याच्या जाणिवेने ज्या अनेकविध चळवळी हाती घेण्यात आल्या आहेत त्यात सहकारी चळवळीला विशेष महत्त्व द्यावे लागेल.

महाराष्ट्र–राज्यात विशेषतः पश्चिम महाराष्ट्रात–सहकारी चळवळ सुसंघटित करून तिची महत्ता सर्वसामान्य लोकांना पटवून देण्यात श्री. वसंतराव दादा पाटील यांचा फार मोठा वाटा आहे. त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही सहकारी चळवळीबद्दल समाजात योग्य वातावरण निर्माण केले व तिला अग्रेसरत्व प्राप्त करून दिले आहे. सहकार महर्षी ही त्यांना मिळालेली पदवी हे त्यांच्या कर्तृत्वाचे मानचिन्ह आहे. अशा या सरळ, स्वच्छ, गोड, कर्तृत्ववान् कार्यकर्त्याचे जीवन व कार्य आजच्या तरुण पिढीला मार्गदर्शक ठरणार आहे.

**वसंतराव नाईक**

## उद्योगपती

महाराष्ट्रात अनेक थोर लोक होऊन गेले. होतीलही. पण श्री. वसंतराव दादा पाटलांचे मोठेपण या सर्वांपेक्षा वेगळे आहे असे मला वाटते. पूर्वीच्या काळी महाराष्ट्राने अटकेपार झेंडे लावले. आपल्या तलवारीचे पाणी त्यांनी परकीय आक्रमकांना वेळोवेळी दाखवले आहे. महाराष्ट्राचा हा थोर वारसा आहे. तो टिकवला पाहिजे यात वाद नाही. पण आजचा काळ बदलला आहे. व्यक्तीला, समाजाला किंवा देशाला विकास घडवून आणायचा असेल तर व्यापार आणि उद्योगधंदे या क्षेत्रांत त्याने आघाडी मारली पाहिजे. तलवारी इतकेच महत्त्व तराजूला आहे हे आपण जाणले पाहिजे. ही गोष्ट बरोबर हेरून त्या दिशेने समाजाला पुढे नेण्याची दादांची जी धडपड आहे ती फार महत्त्वाची आहे. श्रेष्ठ आहे. व्यापार म्हणजेसुद्धा केवळ दलाली किंवा दुकानदारी नव्हे तर उत्पादक धंद्याकडे लक्ष देणे जरूर आहे, हा हिशेब तथाकथित अशिक्षित परंतु खऱ्या अर्थाने अत्यंत सुशिक्षित आणि व्यवहाराची दृष्टी असलेल्या दादांनी मराठी समाजाला शिकवला आहे. कारखानदारी, विक्री, उत्पादन या

विषयांवर दादांना बोलताना मी ऐकले आहे आणि माझी खात्री पटली आहे की दादा राजकारणात न शिरता उद्योगधंद्यात शिरले असते तर एक महान् उद्योगपती झाले असते. चांगल्या शिकल्या सवरलेल्या लोकांनाही उद्योगधंद्यातील गम्य कित्येक वेळा कळत नाही. आपल्या लोकांमध्ये तर या क्षेत्राबद्दल ओढा कमी. आपला महाराष्ट्र आज जो मागे आहे त्याला कारण ही मनोवृत्ती. आणि ही मनोवृत्ती बदलविण्याचे दादांनी सुरू केलेले कार्यच महाराष्ट्राला उत्कर्षाप्रत नेणार आहे. शेतकऱ्यासारख्या अडाणी समजल्या जाणाऱ्या माणसालाही दादांनी कारखानदारी शिकविली. आणि सहकारी साखर कारखानदारीचा धंदा यशस्वी करून दाखविला. दादांची ही कामगिरी म्हणजे एक महान् क्रांती आहे असेच म्हणावे लागेल. महाराष्ट्रातील आजच्या तरुणांनी श्री. वसंतराव दादा पाटलांकडून स्फूर्ती घेतली पाहिजे.

आबासाहेब कुलकर्णी

## ना. अण्णासाहेब शिंदे

श्री. वसंतराव दादा पाटील यांचे व्यक्तिमत्व बहुमुखी आहे. १९४२ च्या चळवळीमध्ये केलेल्या भूमिगत कार्याच्या पायावर स्वातंत्र्योत्तर काळात त्यांनी आपल्या सहकारी कामाची इमारत उठविली. आज ते महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष व त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्य सहकारी पतपेढीचे अध्यक्ष आहेत. पण श्री. वसंतराव दादा आता फक्त महाराष्ट्राचे नसून ते राष्ट्राचे आहेत ही गोष्ट त्यांना गेल्या प्रजासत्ताक दिनी मिळालेल्या पद्मभूषण या पदवीने सिद्ध झाली आहे.

**अण्णासाहेब शिंदे**
केंद्रीय अन्न व कृषी खात्याचे राज्यमंत्री

## उद्योगमंत्री, महाराष्ट्र राज्य

माननीय वसंतरावदादांचे राजकीय आणि सहकारी जीवनकार्य महाराष्ट्रातील जनतेला नेहमीच स्फूर्तिप्रद ठरणारे आहे. केवळ आजच्याच नव्हे, पुढच्या अनेक पिढ्यांना त्यांचे कार्य मार्गदर्शक ठरणारे आहे.

**राजाराम बापू पाटील**

□□

सहकारी क्षेत्रात महाराष्ट्र आज अग्रेसर आहे. त्यांत दादांचा फार मोठा वाटा आहे. हे जाणून त्यांनी सहकारी क्षेत्रांत क्रांति घडवून आणण्याचा प्रयत्न केला. आणि त्याचमुळे त्यांचे नाव 'सहकार महर्षि' म्हणून प्रसिद्ध झाले. ते त्यांच्या मेहनतीचे, कष्टाचे आणि कार्यनिष्ठेचे फळ आहे.

**पी. के. सावंत**

## लेखक

नुसती स्वप्ने पाहणारे नव्हे तर ती सत्यसृष्टीत उतरविणारे एक अत्यंत थोर कार्यकर्ते म्हणून श्री. वसंतराव दादांकडे बोट दाखविता येईल. विधायक कार्याचा डोंगर उभा करणारे आणि त्याबरोबर स्वतः अत्यंत साधे, निर्लोभ, विज्ञानाच्या साहाय्याने आर्थिक परिवर्तन घडावे आणि कष्टकारी सुखी व्हावा या अंतरीच्या तळमळीने सदैव कार्यमग्न असणारे हे थोर नेते आहेत.

**वि. स. खांडेकर**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१६५५८


## समाज कार्यकर्ता

श्री. वसंतराव दादा पाटील आता केवळ सांगलीचे राहिले नाहीत साऱ्या महाराष्ट्राचे झाले आहेत. दादांच्या कर्तृत्वाचे पैलू उभ्या महाराष्ट्रापुढे आहेत. आणि त्यांचे दर्शन आता अखिल भारताला घडू लागले आहे. भारताच्या क्षितीजावरील हा महाराष्ट्राचा तेजस्वी तारा दादांच्या विधायक शक्तीचा खराखुरा प्रत्यय भारताला येईल आणि आपल्या देशात कृषि औद्योगिक समाजरचनेचा पाया भक्कमपणे रोवण्यात दादांचे नेतृत्व व मार्गदर्शन उपयोगी पडेल यात शंका नाही.

दिनेश देसाई

REFBK-0016658

## चिरंजीव

ज्या दादांच्या प्रेमळ छत्राखाली मी लहानाचा मोठा झालो त्यांच्या थोरपणाबद्दल मी काय सांगावे! दादा आज सबंध महाराष्ट्राचेच दादा झाले आहेत. मी एवढेच म्हणेन की दादांच्या स्वभावात प्रेमाचा अखंड झरा वाहतो आहे आणि दादा त्यांच्या सान्निध्यात येणाऱ्या सर्व लोकांवरच पुत्रवत् प्रेम करतात. मला तर त्यांनी पित्याचे प्रेम दिले, आईची मायाही दिली.

राजकीय क्षेत्रात दादा आज उच्च पातळीवर पोहोचले आहेत. राजकारणात आणि सार्वजनिक क्षेत्रातील दादांच्या मार्गदर्शनाचे मूल्यमापन करण्याचे काम माझे नाही. मी एक साधा माणूस पण सामान्य माणसांनी 'माणूस' म्हणून मान ताठ ठेवून आयुष्यात कसे जगावे हे शिकण्यासारख्या अनंत गोष्टी दादांजवळ आहेत.

प्रकाश वसंतरावदादा पाटील

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ...१०७८... वि: ...चरित्र...
स्थाक ...९८७९... नोंद दि ...२०/१२/८६...